महाराष्ट्र प्रदेश भूदान-समिति, प्रकाशन : ३ रें



"आमचा विचार समजल्याशिवाय कोणी जमीन देईल तर आम्हांला दुःख होईल. कसेंहि करून जमीन जमविणें हा कांहीं आमचा उद्देश नाहीं. सर्वोदयाची वृत्ति आम्हांला निर्माण करावयाची आहे."

# .. भूदान यज्ञ ..

# ंका-समाधान

# पार्श्वभूमि

भूदान-यज्ञाची सुरुवात १९५१ मध्यें हैद्राबाद संस्थानांत अचानकपणें झाली. कम्युनिस्टांनीं धुमाकूळ माजविलेल्या तेलंगणांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं विनोबा पायीं फिरत होते. ता. १८ एप्रिल १९५१ रोजीं ते आणि त्यांचे सहकारी नळगोंडा जिल्ह्यांतील पोचमपल्ली या गांवीं यात्रा करीत करीत पोंचले. दुपारच्या वेळीं गांवच्या हरिजन वस्तींतील सारे लोक विनोबांना भेटावयास आले. त्यांनीं आपलीं दुःखें आणि अडचणी त्यांना सांगितल्या. "आम्हांला जमीन नाहीं आणि त्यामुळें कामहि नाहीं. मग आम्हीं पोट कसें भरावें ?" हें त्यांचें मुख्य गाऱ्हाणें होतें. त्यांत जमिनीची तीव्र भूक होती. मोठ्या जमीन मालकांच्या शेतीवर सालभर मजुरी करावी आणि ते देतील त्या तोकड्या पैशावर दिवस काढावे अशी त्यांची परिस्थिति होती. विनोबांनीं त्यांना विचारलें, "किती जमीन पाहिजे ?" त्यांनीं आपापसांत विचार करून सांगितलें, "८० एकर हवी. ४० एकर जिरायत व ४० एकर बागायत." विनोबांनीं पुन्हां प्रश्न केला, "जमीन मिळवून दिली तर ती तुम्ही एकत्र कराल कीं निरनिराळी ?" हरिजनांनीं एकत्र करण्याची तयारी दाखविली. विनोबांनीं त्यांना एक अर्ज लिहून द्या म्हणजे पुढची खटपट करीन असें आश्वासन दिलें.

**ठिणगी :**

गांवचे इतर लोकहि त्या ठिकाणीं हजर होते. विनोबांनीं त्यांना सहज विचारलें, "सरकारकडून जमीन मिळाली नाहीं किंवा मिळण्यास उशीर लागला, तर तुम्ही त्यांना कांहीं जमीन द्याल का ?" त्या बैठकींत श्री. रामचंद्र रेड्डी नांवाचे एक गृहस्थ हजर होते. ते चटकन् म्हणाले, "मी शंभर एकर जमीन या लोकांना भेट म्हणून देतों." भूदानाच्या क्रांतिकारक कल्पनेची ठिणगी या अकल्पित व उदात्त प्रसंगानें विनोबांच्या हृदयांत पडली. मानवी हृदयांत सुप्तावस्थेंत असलेला चांगुलपणा प्रगट झाला आणि त्यानेंच श्री. रेड्डींच्या हातून हरिजनांना जमिनीचें बिनशर्त

दान देवविलें. मानवांतील स्वाभाविक सज्जनतेवर अपार श्रद्धा असलेल्या विनोबांनीं त्या सज्जनतेलाच भूदानाचें मुख्य अधिष्ठान केलें. यासंबंधीं ते म्हणतात, " प्रवास करीत असतां जमिनीचा प्रश्न उभा राहिला. लोकांनीं माझ्याकडे जमीन मागितली व त्यांच्यासाठीं मला ती मिळाली. माझ्या-पुढील प्रश्नाचें उत्तर तेथल्या तेथेंच सांपडेल अशी मला कल्पनाहि नव्हती. अशा प्रकारें जमीन मागितल्याचें व ती इतक्या सहजासहजीं दिल्याचें उदाहरण आजपर्यंत कोठें घडलें नव्हतें. भूहीनांना या मार्गानें जमीन मिळवून देण्याचा हा प्रकार अगदींच नवीन होता. परंतु मी अत्यंत विनयानें, प्रेमानें जमीन मागण्यास सुरुवात केली. दोन महिन्यांतच लोकांनीं दरिद्रनारायणासाठीं मला बारा हजार एकर जमीन दिली. सर्व गांवांतुन दान देणारे असे सज्जन लोक निघाले, तर कम्युनिस्टांचा प्रश्न आपोआपच सुटेल."

**अहिंसक पर्याय :**

कम्युनिस्टांचा प्रश्न त्या वेळीं तेलंगणांत खरोखरच गंभीर होता. सर्व शांतताप्रिय व्यक्तींचें, राजकीय पक्षांचें व सरकारचें लक्ष त्या प्रश्नानें वेधून घेतलें होतें. जमिनीचा प्रश्न अत्याचाराच्या मार्गानें सोडविण्याचा कम्यु-निस्टांचा प्रयत्न म्हणजे भारतांतील नवोदित लोकसत्तेच्या बुडाशीं लागलेला सुरुंग होता. पुंडाई व अत्याचाराच्या मार्गानें जमिनदारांकडील जमिनी हिसकावून घेऊन त्या शेतकऱ्यांना वांटून देण्याची चळवळ कम्युनिस्टांनीं उभारली होती. भूहीनांना ते अत्याचारास प्रवृत्त करीत होते. या पुंडाईत ३ हजार लोकांचे खून पाडण्यांत आले आणि ८ कोटींपेक्षां अधिक किंमती-च्या संपत्तीचा विध्वंस झाला. एवढी किंमत देऊन कम्युनिस्टांनीं त्यांच्या हिशेबाप्रमाणें अवघी २० हजार एकर जमीन मिळविली. तिचें न्याय्य वांटपहि कम्युनिस्ट करूं शकले नाहींत. पुढें तर ती जमीन सरकारनें ज्या त्या जमीनदारास परत दिली. ही दहशतवादी चळवळ दडपून टाकण्यासाठीं सरकारनेंहि आपली सारी शक्ति व पैसा पणास लावला. यावर दरवर्षीं पांच कोटी रुपये सरकार खर्च करीत होतें. इतकेंहि करून कम्युनिस्टांना दडपून टाकण्यांत त्याला यश येत नव्हतें. सरकारचे पोलिस आणि

कम्युनिस्ट यांच्या जात्यांत गरीब जनता मात्र भरडून निघत होती. परंतु कम्युनिस्टांच्या चळवळीचा निःपात बंदुकीच्या गोळीनें होणें शक्य नव्हतें. विनोबा त्याविषयीं म्हणतात, "असले प्रश्न लष्कराच्या बळावर सुटत नसतात. ज्या ठिकाणीं नुसती वाघाचीच शिकार करावयाची असेल तेथें लष्कराचा उपयोग होऊं शकेल. परंतु जेथें एखाद्या विचारसरणीलाच तोंड द्यावयाचें असेल तेथें पर्यायी विचारसरणीनेंच तें काम होईल. आजच्या काळचा मुख्य प्रश्न भूमीचा आहे. आज तेलंगणांत जो प्रश्न उभा आहे तो उद्यां सबंध हिंदुस्थानांत उपस्थित झाल्याखेरीज राहणार नाहीं. आपण सर्वांनीं त्याला तोंड दिलें पाहिजे आणि म्हणूनच तो सोडविण्याचा अहिंसक मार्ग शोधून काढण्यास मी प्रवृत्त झालों."

## देशव्यापी आंदोलन :

नंतर विनोबा तेलंगणांत अडीच महिने हा नवसंदेश घेऊन फिरले आणि प्रत्यक्ष अनुभवानेंच त्यांनीं आपल्या मार्गाचा प्रभावीपणा सिद्ध करून दाखविला. त्यानंतर सप्टेंबर १९५१ मध्यें पंडित नेहरूंच्या निमंत्रणा-वरून विनोबा दिल्लीला योजना-समितीच्या सभासदांशीं पंचवार्षिक योजने-संबंधीं चर्चा करण्यासाठीं निघाले. त्यांनीं पायींच जावयाचें ठरविलें. वर्धा-पवनारपासून पुनश्च त्यांची यात्रा सुरू झाली. दिल्लीला पोहोंचेपर्यंत वाटेंत हजारों एकर जमीन त्यांना मिळाली. दिल्लीहून ते थेट उत्तर प्रदेशांत गेले. तेथें वर्ष-सवा वर्ष ते पायीं फिरले आणि सुमारें साडेतीन लाख एकर जमीन त्यांनीं मिळविली. त्यानंतर त्यांनीं बिहार प्रदेशांत प्रवेश केला. बिहारांत जवळ जवळ दोन वर्षें अखंडपणें त्यांचें वास्तव्य पदयात्रांच्या रूपानें आहे. या मुदतींत (ता. ५ ऑगस्ट १९५४ पर्यंत) तेथें २०,९९,००० एकर जमीन मिळाली आहे व १५ संपूर्ण गांवें मिळालीं आहेत. इतक्या एकाग्र प्रचारामुळें बिहारचें वातावरण पालटलें आहे. जमिनीची खरेदी-विक्री जवळ जवळ बंद झाली आहे. जमिनीच्या किंमती घसरल्या आहेत, आणि 'बिहारचा प्रश्न सोडवूनच बिहार सोडीन' ही विनोबांची प्रतिज्ञा आतां सफलतेच्या मार्गाला लागली आहे. १९५२ मध्यें सेवापुरी येथें सर्वोदय समाजानें १९५४ च्या सर्वोदय संमेलनापर्यंत

२५ लाख एकर जमीन साऱ्या देशांतून मिळविण्याचा केलेला संकल्प १९५४ च्या एप्रिल महिन्यांत बोधगया येथील संमेलनापर्यंत २३ लाखांपर्यंत पूर्ण झाला. ही संकल्पपूर्ति करण्याच्या कामीं श्री. शंकरराव देव, जयप्रकाश नारायण आणि इतर अनेक थोर कार्यकर्त्यांनीं परिश्रम केले. अर्थात् सर्व प्रांतांनीं आपापले संकल्प पूर्ण केले असा याचा अर्थ नाहीं. फक्त उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, सौराष्ट्र आणि हैदराबाद यांचे ठरलेले संकल्प पूर्ण झाले आहेत. इतरांचे व्हावयाचे आहेत. परंतु संकल्पपूर्ति करण्यासाठीं लागणारें चैतन्यबळ या आंदोलनांत कमी पडतें हें पाहून बोधगया संमेलनांत श्री. जयप्रकाश नारायण यांनीं आपलें जीवन या कार्यासाठीं अर्पण केल्याचें जाहीर केलें. आणि मग विनोबांपासून सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सुमारें ८०० लोकांनीं आपलें 'जीवनदान' केलें. या आंदोलनाला मिळालेलें हें ताजें भव्य स्वरूप आहे. बोधगयेच्या संमेलनानें यापुढें जमिनीची ताबडतोब वांटणी करण्याचा आणि वांटलेल्या जमिनींत वसविल्या जाणाऱ्यांच्या मदतीसाठीं संपत्तिदान व श्रमदान सार्वत्रिक रीतीनें मिळविण्याचा ठराव केला. त्याचप्रमाणें जमीन-वांटणीच्या निमित्तानें समाजाची घडी सर्वोदय विचारावर बसविण्याचा प्रयोगहि आतां पूर्ण ५० गांवें मिळालीं आहेत त्या गांवांत सुरू झाला आहे.

# शंका-समाधान

**★ विनोबांचा हा प्रयत्न इतिहासाच्या विरुद्ध नाहीं काय ? पांचच काय पण पांचशें वर्षांतहि या मार्गानें हा प्रश्न सोडवितां येणार नाहीं.**

" ज्यांच्याजवळ जमीन आहे त्यांनीं ती स्वेच्छापूर्वक बिनजमीनवाल्यांना द्यावी हा माझा प्रयत्न इतिहासाविरुद्ध नाहीं. परंतु इतिहासांत जें घडलें त्याविरुद्धहि गोष्टी घडूं शकतात. रशियांतील क्रांतीसारखी घटना पूर्वी कधीं कोठें घडली नव्हती, तरी रशियांत ती घडली. तशीच ही क्रांतीसुद्धां येथें होईल. एका बलाढ्य साम्राज्याला ' भारत छोडो ' म्हणून सांगावें आणि त्यानें भारत सोडून निघावें अशी घटना कोणत्या युगांत घडली होती ? पण या देशांत ती घडलीच कीं नाहीं ? हें विज्ञानाचें युग आहे. या युगांत कोणतीहि गोष्ट पांच वर्षांत घडणें अशक्य नाहीं. माझें काम इतिहासाच्या विरुद्ध तर नाहींच पण ती एक ऐतिहासिक आवश्यकता आहे, काळाची ती मागणी आहे. कोणी म्हणतात पांचशें वर्षांतसुद्धां तुम्ही हा प्रश्न सोडवूं शकणार नाहीं. मला त्यांना सांगावयाचें आहे कीं, क्रांत्या अशा गणिती हिशेबानें होत नसतात. गांधीजींनीं एका वर्षांत स्वराज्य मिळवून देतों असें म्हटलें होतें. जर आम्ही त्यांच्या सांगण्याप्रमाणें खरोखरच वागलों असतों, तर स्वराज्य केव्हांच मिळून चुकलें असतें; तरीसुद्धां पंचवीस वर्षांतच तें मिळालें. जेथें जनतेच्या जीवनांत परिवर्तन करावयाचें असतें तेथें हिशेब करून चालत नाहीं. मी आपणांस सांगूं इच्छितों कीं, हें काम तांत्रिक किंवा यांत्रिक नाहीं, तें मांत्रिक आहे. त्याचा एक मंत्र आहे. तो समाजांत घुमूं लागला कीं मग तो तीव्र गतीनें काम करूं लागेल. उशीर लागतो तो मंत्र सिद्ध करण्याला. तो सिद्ध झाला कीं काम सिद्ध झालेंच असें समजा. म्हणून हें काम पांचशें नव्हे एका वर्षांतहि पुरें होऊं शकतें. " विनोबांनीं स्वतःच या प्रश्नाला वरीलप्रमाणें उत्तर देऊन ठेवलें आहे. कोणत्याहि क्रांतिकारक व नवीन कल्पनेवर प्रथम असाच इतिहास–विरोधाचा आक्षेप घेतला जातो. परंतु भूदानाचें गेल्या तीन वर्षांतील यश हा भावी यशाचा विसारा आहे.

वस्तुनिष्ठ दृष्टीनें विचार करणाऱ्या कोणाहि चिकित्सकाला तें यश नाकारतां येणार नाहीं इतकें तें स्पष्ट आहे. खुद्द विनोबांना कल्पना नसेल इतकें यश त्यांना मिळत आहे. जयप्रकाश नारायण म्हणतात त्याप्रमाणें "क्रांति प्रत्यक्ष होत आहे. डोळे उघडे ठेवून पाहण्याची मात्र आवश्यकता आहे." विनोबा म्हणतात, "ज्या परमेश्वरानें मला भूदान मागण्याची प्रेरणा दिली तोच इतरांना दान देण्याची प्रेरणा दिल्याशिवाय कसा राहील? परमेश्वर कोणतेंहि काम अर्धवट करीत नाहीं. बाळाला जन्म दिला कीं आईच्या स्तनांत तो त्याच्यासाठीं दूध निर्माण करतोच." विनोबांची ही अदम्य श्रद्धा घेऊन सर्वांनीं काम केलें तर पांच नव्हे एका वर्षांतहि हा प्रश्न सुटेल.

प्रत्यक्ष जमीन प्राप्त होण्याच्या बाबतींत भूदान यशस्वी ठरो वा न ठरो, त्यांतून निर्माण होणारें क्रांतिकारक वातावरण व नवीन मूल्येंच तें काम पुरें करतील. विनोबांच्या यज्ञांतून खासगी मालकीहक्काच्या भावनेला जबरदस्त धक्का बसला आहे. समाजोपयोगी धन हें समाजाच्या मालकीचें असलें पाहिजे, या सिद्धान्ताला आतां प्रभावी विरोध होऊं शकणार नाहीं. व्यावहारिक दृष्ट्या पाहिलें तरी जेथें भूदानाचें आंदोलन जोरांत आहे त्या बिहार व उत्तर प्रदेशासारख्या प्रांतांत जमिनीच्या किंमती घसरत आहेत. नवीन व्यवहार बंद झाले आहेत. जमिनीचें बाजारी मूल्य कमी झालें आहे. जमीन ही विक्रयाची वस्तु नाहीं, ही कल्पना समाजांत भूदानांतून रूढ झाली तर जमिनीचा निम्मा प्रश्न निकालांत निघेल.

### ★ जमिनीच्या फेरवांटपाचा प्रश्न हृदयपरिवर्तनासारख्या दूरच्या मार्गानें सोडविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां कायद्यानें झटपट कां सोडवीत नाहीं?

कायदा करणें सरकारचें काम आहे. तें त्यानें अवश्य करावें. पण केवळ कायद्याच्या फटकाऱ्यानें जमिनीची विषम वांटणी नाहींशी करतां येणार नाहीं. मुंबई प्रांतांत गेल्या सहा वर्षांत शेतीविषयक नऊ-दहा कायदे झाले. अनुभव असा आहे कीं, योग्य मतपरिवर्तनाच्या अभावीं त्या कायद्यांतून पळवाटा काढून त्यांतील जनहिताचें मूळ तत्त्व धाब्यावर कसें बसवितां येईल, याचाच

प्रयत्न अधिक झाला. कूळकायद्यांत दुरुस्ती होऊन कुळांनीं मालकांना $\frac{1}{6}$ खंड द्यावा असें ठरलें. पण कायद्यांतून पळवाटा काढून हा खंड अधिक कसा घेतां येईल याचाच प्रयत्न होत असल्याचा अनुभव आहे. कायद्यानें जमिनीवरून कुळांना विनाकारण काढतां येत नाहीं. पण आज सरसहा बेदखलीचे प्रकार चालू आहेत कीं नाहीं ? तेव्हां केवळ कायद्यानें प्रश्न सुटत नाहींत. अस्पृश्यतानिवारण व दारूबंदीचे कायदे हींहि या बाबतींतील समर्पक उदाहरणें आहेत.

तेव्हां कायद्यानें प्रश्न सुटत नाहीं. कायद्याच्या यशस्वितेसाठीं अगोदर समाजांत विचारपरिवर्तन व्हावें लागतें. कायदा हा विचारपरिवर्तनानंतर येतो, आधीं नाहीं. कायद्याच्या बळाऐवजीं लोकांच्या बळानेंच, म्हणजे ' स्वतंत्र जनशक्ती 'नेंच समाजक्रांतीचे विविध प्रश्न सोडविण्यावर विनोबांचा विशेष भर आहे. या ' स्वतंत्र जनशक्ती 'चें विनोबांनीं केलेलें स्पष्टीकरण : " स्वतंत्र जनशक्ति म्हणजे हिंसाशक्तीच्या अगदीं विरुद्ध पण दंडशक्तीहून भिन्न अशी शक्ति. "

विनोबा म्हणतात, " बाप मुलावर प्रेम करतो तें काय कायद्यानें ? आई मुलाला दूध पाजते तें काय कायद्यामुळें ? मनुष्याच्या जीवनांत अशी एक शक्ति आहे कीं जिच्यामुळें त्याचें जीवन समृद्ध झालें आहे. ती म्हणजे प्रेमशक्ति होय." समाजांतील दुःख व अन्याय पीडितांविषयींच्या आंतरिक प्रेमांतून आणि न्यायाच्या जाणिवेंतूनच नाहींसे होऊं शकतील. कायद्यानें प्रश्न वरकरणीं सुटल्यासारखा कदाचित् वाटला, तरी कटुतेचीं व द्वेषाचीं बीजें त्यामुळें समाजांत पेरलीं जातात. भूदानाला तें टाळावयाचें आहे.

शिवाय कोणताहि कायदा शंभर टक्के यशस्वी करावयाचा तर त्यासाठीं निष्ठुर दंडशक्तीचा उपयोग करावा लागतो. आणि त्यांतून अखेरीस हुकूमशाहीच निर्माण होण्याचा धोका असतो. चीननें आपली सारी जमीन कायद्यानें प्रत्येकीं सात एकरांप्रमाणें शेतकरी कुटुंबांत वांटून दिली, पण हा कायदा अंमलांत आणतांना ज्यांनीं त्यास विरोध केला अशा दहा लाख लोकांना तेथें फांशीं देण्यांत आलें. जनरल मॅक्‌ऑर्थरच्या कारकीर्दींत जपानमध्यें प्रत्येक कुटुंबाला दोन-अडीच एकर जमीन देण्यांत आली तीसुद्धां

बडग्याच्या जोरावर. भारतांत लोकशाही कारभार यशस्वी करावयाचा असेल, तर कायद्यापेक्षां मतपरिवर्तनावरच अधिक भर दिला पाहिजे.

हे तात्त्विक मुद्दे सोडले तरी जमिनीच्या फेरवांटपाचा प्रश्न कायदा न करतां भूदानानें सोडविण्यांत अनेक व्यावहारिक फायदेहि आहेत. कायद्यानें जमीनदारी नाहींशी करावयाची म्हणजे जमीनदारांना मोबदला देण्याचा बिकट प्रश्न उभा राहतो. भूदानांत विनामोबदला जमीन मिळत असल्यानें तो प्रश्न आपोआपच सुटतो. सीलिंगचा, म्हणजे एखाद्याजवळ जास्तींत जास्त किती जमीन ठेवली जावी, हा विवाद्य प्रश्नहि भूदानामुळें मुळांतच निकालांत निघतो. कारण भूदान-यज्ञ ' सीलिंग 'चें तत्त्व मानीत नाहीं; ' फ्लोरिंग 'चें म्हणजे कमींत कमी प्रत्येकाजवळ किती जमीन असावी हें तत्त्व मानतो; जमीनमालकीच्या बाबतींत सर्वांनाच सारख्या पातळीवर आणूं इच्छितो. प्रत्येक भूहीन कुटुंबाला गरजेपुरती जमीन मिळवून देणें हा भूदानाचा उद्देश आहे.

**★ हिंसेनें क्रांति घडवून आणली तर हुकूमशाही येईल आणि लोकांचें स्वातंत्र्य नाहींसें होईल, हें समजण्याजोगें आहे, परंतु लोकशाहीच्या राज्यपद्धतींत कायदे करून समाजपरिस्थितींत बदल केला तर तें लोकशाहीला बाधक कसें होईल ?**

लोकशाहीची अंतिम पूर्णावस्था म्हणजे राज्यशासन नष्ट होणें, ही सर्वच विचारवंतांनीं मान्य केली आहे. अशी शासनमुक्त समाजव्यवस्था आणणें हेंच प्रत्येक प्रगतिशील समाजाचें ध्येय असलें पाहिजे असें आज मानलें जातें. लोकशाहीची व्याख्या ' लोकांकडून लोकांकरितां चालविलें गेलेलें लोकांचें राज्य ' ( Government of the People, for the People, by the People ) अशी सांगितलेली आहे. यांतील पहिलीं दोनच लक्षणें आमच्या लोकशाहीचीं म्हटल्या गेलेल्या राज्यांत दाखल झालेलीं दिसतात. तिसरें लक्षण ' लोकांचें राज्य ' ( of the People ) हें तेव्हांच प्रकट होईल जेव्हां बहुतेक सर्व कारभार लोकच स्वतः चालवूं लागतील आणि कायद्याचा म्हणजे दंडशक्तीचा अंमल कमींत कमी होईल.

दंडशक्तीच्या आधारानें सेवेचीं कामें होऊं शकतात, पण ती शुद्ध सेवा नव्हे. वरून सक्ती करून तीं अंमलांत येतात. त्यांतून सक्ती करणाऱ्याचा एक वर्ग निर्माण होतो आणि लोक म्हणजे शासित हे शासकांपासून वेगळे राहतात. दंडशक्ति ही हिंसाशक्तीहून जरी वेगळी असली तरी जनशक्तीहूनहि ती वेगळी आहे हें समजून घेतलें पाहिजे. समाजांत शोषण आणि अन्याय नसावा याकरितां लोकांनीं स्वेच्छेनेंच स्वतःवर नियंत्रण घालून घेण्याचा स्वभाव बनविला तरच दंडशक्तीची गरज राहणार नाहीं हें उघड आहे. लोकांचा तो स्वभाव बनेल असा प्रयत्न लोकांच्या नित्याच्या व्यवहारांतून करणें ही शुद्ध सेवा आहे त्यांतून लोकांची आत्मशक्ति वाढेल आणि खऱ्या लोकशाहीचीं मूल्यें समाजांत स्थिर होतील. भूदान-यज्ञाच्या रूपानें दंडशक्तिनिरपेक्ष अशी स्वतंत्र जनशक्ति निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. कायदा बदलल्यानें समाज बदलतो असें नाहीं. पण जनशक्तीनें समाजांतील मूल्येंच बदलतात. लोकांचें स्वातंत्र्य कायम राहूनहि शोषण आणि अन्यायरहित समाजरचना निर्माण होते. म्हणून भूदान-यज्ञ कायद्याचें अधिष्ठान मान्य करीत नाहीं.

**★ बडे जमीनदार, जहागिरदार व राजेमहाराजे यांच्याकडून भूदानासाठीं जमीन मागतां हें ठीक आहे. पण बिचाऱ्या गरीब शेतकऱ्यांपासून दान घेऊन त्यांना अधिकच गरीब कां करतां ?**

**विनोबांचें याला उत्तर असें :**

" बड्या लोकांपासून जमीन घेतल्याशिवाय तर मी राहणारच नाहीं. परंतु सर्वांनींच मला दान करावें अशी माझी इच्छा आहे. याचा अर्थ सर्वांकडून मी सारख्याच प्रमाणांत जमीन मागतों असा नाहीं. मध्यमश्रेणींतील शेतकऱ्यांकडून मी सहावा हिस्सा मागतों. बड्या जमीनमालकांकडे त्यांनीं आपल्या गरजेपुरती ठेवून बाकी सर्वच जमीन द्यावी, अशी मी मागणी करतों; आणि जे अगदींच गरीब आहेत त्यांनीं नैवेद्य म्हणून त्यांना शक्य असेल तेवढी जमीन द्यावी अशी अपेक्षा करतों. चार कारणांसाठीं मी त्यांच्याकडून जमीन घेतों :

( १ ) आज समाजांत सर्वांत दुर्दशावस्थेंत कोण असतील तर ते भूहीन शेतकरी होत. त्यांच्याशीं तुलना करतां गरीब शेतकरीसुद्धां सुखी आहेत. समाजांत जे सर्वांत दुःखी आहेत त्यांच्यासाठीं सर्वांनींच थोडा थोडा त्याग केला पाहिजे. भूतलावर सर्वांत नीचस्थानीं समुद्र असतो. म्हणून तर दुनियेंतील साऱ्याच ठिकाणचें पाणी त्यांत वाहत जातें ना ? त्याचप्रमाणें समाजांतील सर्वांत नीचस्थानीं असलेल्यांसाठीं कांहीं करणें ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, ही गोष्ट मला लोकांना शिकवावयाची आहे. नाहीं तर ज्यांच्यापाशीं कमी जमीन आहे त्यांनीं भूहीन लोकांसाठीं कांहीं करण्याची गरज नाहीं असें लोकांना वाटूं लागेल.

( २ ) जमिनीवर कोणाचाच स्वामित्वाचा हक्क राहतां कामा नये ही गोष्ट मी लोकांना शिकवूं इच्छितों. श्रीमंत जसे स्वतःला आपल्या जमिनीचे मालक समजतात तसे गरीबहि आपल्या एवढ्याशा जमिनीचे आपण मालक आहोंत असें समजतात. या दोघांचीहि स्वामित्वाच्या भावनेपासून मुक्तता करण्याची माझी इच्छा आहे.

( ३ ) श्रीमंतांपासून आपण जमीन मागतों. त्यासाठीं त्यांच्यावर आपणांला कांहीं दडपण तर आणलें पाहिजे ? पण हें दडपण कोणतें आणावयाचें ? आपल्यापाशीं दंडशक्ति नाहीं, पिस्तूल नाहीं आणि पिस्तुलाच्या ताकदीवर आपला विश्वासहि नाहीं. म्हणून आपणांस नैतिक शक्ति निर्माण करावयाची आहे. हजारों गरिबांनीं भूदान केलें, तर त्यांतून एक नैतिक शक्ति पैदा होईल व तिचा श्रीमंतांवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. आणि आज तें घडतहि आहे. बिहारमधील हजारीबाग व गया जिल्ह्यांत श्रीमंतांनीं मला पुष्कळ दान केलें. गेलीं दोन वर्षें गरीबांनीं मजवर जो दानाचा वर्षाव केला त्याचाच हा परिणाम आहे.

( ४ ) मीं कित्येक वेळां सांगितलें आहे कीं, आम्ही आमची सेना गरीब भूदात्यांतून उभी करीत आहोंत. उच्च-नीच भेद आम्हांस नाहींसे करावयाचे आहेत आणि अशी सेना बनवायची आहे कीं, जिच्या साहाय्यानें आम्ही आमची लढाई लढूं शकूं. ज्यांनीं दान केलें आहे, ज्यांनीं कांहीं त्याग केला आहे किंवा ज्यांनीं आमच्याबद्दल सहानुभूति दाखविली

आहे तेच सारे आमचे सैनिक होतील. श्रीमंतांचीं हृदयें आमच्या प्रयत्नांनीं खुलीं झालीं नाहींत, तर आम्हांला आणखी एक पाऊल पुढें टाकावें लागेल. आणि गंमत अशी कीं त्या वेळीं कांहीं श्रीमंतहि या आमच्या सैन्यामधले सैनिक होतील.

..."या माझ्या सेनेचें सामर्थ्य इतकें जबरदस्त असेल कीं, तिला कदाचित् लढाईहि करावी लागणार नाहीं. 'हुंकारेणैव धनुषः–' तीर सोडावयाचीहि जरूरी राहणार नाहीं, धनुष्याचा नुसता टणत्कार ऐकूनच समोरच्या शत्रूंची दाणादाण उडावी तसें, आमच्या सेनेचा नुसता हुँकार ऐकूनच आमचें काम फत्ते होईल. लाखों लोकांनीं दान केलें, तर लढाईशिवायहि काम होईल. हजारीबाग जिल्ह्यांत मला साडेचार लाख एकर जमीन मिळाली. परंतु तेवढ्यानें मला समाधान वाटेना. मी तेथील कार्यकर्त्यांना सांगितलें कीं, मला साठ हजार दानपत्रें पाहिजेत. या माझ्या सांगण्याचा काय अर्थ आहे? जनशक्ति आणि नैतिक शक्ति निर्माण करण्याचा याहून दुसरा श्रेष्ठ मार्ग नाहीं."

**★ भूदानांत जमीनमालकांकडून दान म्हणून जमीन घेणें म्हणजे पर्यायानें त्यांचा त्या जमिनीवरील मालकीहक्क मान्य करण्यासारखें आहे. मालकीहक्काच्या कल्पनेला यांतून जीवनदानच मिळत नाहीं काय? आणि त्यामुळें क्रांतिकारक भावना मोडून टाकली जात नाहीं काय?**

"आपली वस्तु कोणी एखादा स्वखुषीनें परत देत असेल तर त्यामुळें तो त्या वस्तूचा मालक झाला असें आम्ही मानतों असें कसें म्हणतां येईल? समजा, आपली एखादी वस्तु कोणी तरी चोरून नेली आहे. त्या चोराला समजावून सांगून ती वस्तु आपण परत मिळविण्याचा यत्न करीत आहोंत. त्याला दमदाटी, धमकावणी देत नाहीं, परंतु त्याच्या या कृत्याचे दुष्परिणाम काय होतील तें त्याला समजावून सांगून त्याच्याशीं झगडा टाळण्याचा प्रेमपूर्वक प्रयत्न करीत आहोंत. या प्रयत्नामुळें त्यानें आपली वस्तु परत केली तर त्यांत बिघडलें कुठें? जोर जबरदस्ती आणि लठ्ठालठ्ठी काय क्रांतीसाठीं अनिवार्य आहे असें समजावयाचें? तसें मानलें तर त्याचा

अर्थ असा होईल कीं, जितकी हिंसा जास्त तितकी क्रांति अधिक परंतु हा अपसिद्धान्त आहे. अहिंसेनेंच क्रांति झाली पाहिजे असा ज्याचा आग्रह नाहीं असा हिंसात्मक क्रांतीचा पुरस्कर्ताहि हा सिद्धान्त खचितच मान्य करणार नाहीं. क्रांतिवाद्यांमध्येंहि कांहीं लोक परंपरागत विचारांचे गुलाम व जीर्णमतवादी असतात. परस्पर-संमतीनें संघर्षाविना होणारें सामाजिक स्थित्यंतर ही क्रांतीच नव्हे असें मानणारे लोक जीर्णमतवादी होत. क्रांती-मध्यें संघर्षाला किंवा रक्तपाताला महत्त्व नसून सामाजिक परिवर्तनाला महत्त्व असतें.

भारतांतील संस्थानिकांनीं लढाईशिवाय आपलीं संस्थानें सोडलीं. मग काय त्यामुळें देशाचें नुकसान झालें ? उपकार किंवा भिक्षा म्हणून कांहीं तीं संस्थानें आपण स्वीकारलीं नाहींत. आपली ताकद व युगाकांक्षा ओळखूनच संस्थानिकांनीं सत्तासंक्रमण केलें.

धनवानांना आपण त्यांच्या धनाचे स्वामी मानीत नाहीं. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, आज धन त्यांच्या ताब्यांत आहे. आपण त्यांना त्यावरील स्वामित्व सोडावयास सांगत आहोंत. ही गोष्ट त्यांनीं समजुतीनें व प्रेमानें मानली तर त्यामुळें क्रांति सदोष कशी होते ? अंगणांतील झाडापासून मध मिळाला, तर डोंगरकपारी तुडवून तो मिळविला पाहिजे हा काय आग्रह ? क्रांतिवाद्यांना संपत्ति हिसकावून घ्यावयाची आहे कीं तिचें विसर्जन करावयास लावायचें आहे ? स्वेच्छेनें, समर्पणबुद्धीनें आणि हिसका-वून न घेतां संपत्तीचें विसर्जन होत असेल तर त्यामुळें क्रांतींत कोणती कमतरता निर्माण होते तें समजत नाहीं. अशा स्थितींत सक्तीनें संपत्ति हिसकावून घेण्याचा आग्रह धरणें वैचारिक गोंधळाचें द्योतक आहे. केवळ आपल्यांतील असमर्थतेमुळें आणि दुर्बलतेमुळें असहाय्य होऊन आपण दानमार्ग स्वीकारला असेल तर तें क्रांतिविरोधी होईल. परंतु आपली शक्ति व कालपुरुषाचीं पावलें ओळखून जर संपत्तिवान लोक आपली संपत्ति समाजाला अर्पण करतील तर देणारे व घेणारे दोघेहि धन्य होतील.”

—दादा धर्माधिकारी

## ★ शेवटीं जमीन कोणाची ? व्यक्तीची कीं समाजाची ? भूदान-यज्ञाला जमिनीवर खासगी मालकी प्रस्थापित करावयाची आहे काय ?

आकाश, प्रकाश, वारा आणि पाणी यांवर जसा सर्वांचा अधिकार तसा जमिनीवरहि सर्वांचा हक्क असला पाहिजे, असा भूदान-चळवळीचा दावा आहे. परंतु याचा अर्थ जमीन कसणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना सारी जमीन सारखी वांटून देऊन तीवर त्यांचा व्यक्तिगत मालकी हक्क प्रस्थापित करावयाचा असा नाहीं. आज जरी भूदानांत मिळालेली जमीन भूहीनांच्या नांवें करून देण्यांत येत असली तरी ती पहिली पायरी आहे. शेवटीं जमीन गांवाच्याच मालकीची या आंदोलनानें करावयाची आहे. 'सबै भूमि गोपालकी' म्हणजे सारी जमीन परमेश्वराची अर्थात् समाजाची, हें या आंदोलनाचें सारतत्त्व आहे. जमिनीवर कोणाहि एका व्यक्तीचा मालकी हक्क भूदानानें मानलेला नाहीं. गांवांतील शेतीव्यवस्थेची आपली कल्पना विनोबांनीं पुढील शब्दांत मांडली आहे :

"आम्हांला गांवांतील सारी जमीन शेवटीं गांवाच्या मालकीची करावयाची आहे, ग्रामीकरण करावयाचें आहे. पण वितरण व ग्रामीकरण यांत मी फरक मानीत नाहीं. साऱ्या जमिनीवर एकाच वेळीं व एकाचकडून शेती होणें शक्य नाहीं. त्यासाठीं जमिनीचे सोयिस्कर तुकडे करावेच लागतात. माझ्या योजनेंत कोणा व्यक्तीचें जमिनीवरील स्वामित्व मान्य केलेलें नाहीं. परंतु ग्रामीकरणांत जरूरीप्रमाणें जमिनीचें व्यक्तिगत वांटप झालें तरी त्या जमिनीवर शेतकऱ्याची खासगी मालकी राहणार नाहीं. तो तिचा सेवक होईल, मालक नव्हे. ग्रामीकरणानंतर जमीन ग्रामपंचायतीची होईल, तिच्या नांवानेंच ती सरकारी दसरांत नोंदली जाईल आणि गांवांतील लोकांना तिच्यामार्फतच ती कसावयास मिळेल. सर्वांच्या संमतीनें दर दहा किंवा पांच वर्षांनीं तिची फेरवांटणी केली जाईल. मात्र कोणी तरी एका मॅनेजरनें गांवच्या शेतीची व्यवस्था पहावयाची व आपण फक्त रोज आठ तास काम करावयाचें आणि नंतर सुटी घ्यावयाची असा ग्रामीकरणाचा अर्थ नाहीं. जमिनीवर आपली मालकी असली म्हणजेच तिची काळजी घ्यावयाची,

नाहीं तर निष्काळजी राहावयाचें असें ग्रामीकरणांत चालावयाचें नाहीं. मालक न राहतांहि मालकाप्रमाणेंच जमिनीची काळजी घेण्यास आपणांस शिकावयाचें आहे. "

जमिनीचें राष्ट्रीयीकरण आणि ग्रामीकरण यांमधील फरक वरील विचारांतून स्पष्ट होतो. राष्ट्रीयीकरणांत राष्ट्राच्या मध्यवर्ती सत्तेच्या नियंत्रणाखालीं पांच लाख खेड्यांतील सर्व जमीन मानली जाते, तर ग्रामीकरणांत प्रत्येक गांवच्या हातीं तिथल्या जमिनींवरील सत्ता सोपविली जाते.

**★ दान मागण्यानें मागणाऱ्याचें शील राहात नाहीं, त्यांच्यांत लाचारी येते; उलट दान देणाऱ्याला थोडासा त्याग केल्यानें सुरक्षितता लाभते व मोठेपणा मिळतो, असा या चळवळीवर आक्षेप आहे. याला उत्तर काय ?**

" दानानें मिंधेपणा येतो, देणाराचा हात वर असतो, घेणाराचा खालीं असतो, असा सार्वत्रिक समज आहे. याचें कारण दान आणि भिक्षा या दोन कल्पनांची आपल्या मनांत गल्लत झालेली आहे. भिकारी दीन व मिंधा बनतो, हें खरें आहे. पण आजपर्यंत ज्या जातींनीं किंवा ज्या वर्गांनीं दान घेतलें त्या जाती किंवा ते वर्ग मिंधे बनण्याऐवजीं चढेल आणि घमेंडखोर बनले असा आपला अनुभव आहे. त्यांच्यापैकीं जे अनुत्पादक होते त्यांच्यावरील इतरांची श्रद्धा नाहींशी झाल्याबरोबर ते वर्ग आणि त्या जाती अधोगतीला जाऊं लागल्या. पण त्याचें कारण ते वर्ग आणि त्या जाती दानावर जगत होत्या हें नसून, त्या अनुत्पादक होत्या हें आहे. आपली संपत्ति आणि श्रीमंती जाणार आहे, खात्रीनें जाणार आहे, याबद्दल संपत्तिमान् वर्गाच्या मनांत तिळमात्रहि शंका राहिलेली नाहीं. भांडवलशाहींतील अंतर्विरोधाचा आतां इतका कडेलोट झाला आहे कीं, तिला मरणाची कळा आली आहे. अशा स्थितींत तो वर्ग जें दान करील तें संपत्तीच्या संरक्षणाकरितां करील असें मानणें चुकीचें आहे. श्रीमंतांच्या श्रीमंतीचें संरक्षण आतां कुणीहि करूं शकणार नाहीं, आलंकारिक भाषेंत बोलावयाचें तर विधाताहि करूं शकणार नाहीं. अशा स्थितींत श्रीमंतांना

त्यांच्या संपत्तीचें विसर्जन करण्याची संधी देणें क्रांतीचा मार्ग सुकर करण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. दान म्हणजे समविभागणी. 'दानं संविभागः' अशी शंकराचार्यांची दानाची व्याख्या आहे. दान ही भिक्षा नव्हे, दान हा उपकार नव्हे, दान ही मेहरबानी नव्हे. जें सांठविलें आहे तें वांटून देण्याची ती प्रक्रिया आहे, परिग्रहाचें तें प्रायश्चित्त आहे, संपत्तीच्या विसर्जनाचा तो संकेत आहे."

—दादा धर्माधिकारी

## ★ भूदान-यज्ञ अयशस्वी झाला तर पुढें काय ?

" मी असा विचार कधीं करीत नाहीं. कारण माझी परमेश्वरावर श्रद्धा आहे आणि भूदान-यज्ञाचें काम हें त्याच्याच प्रेरणेनें सुरू झालें आहे. म्हणून तें त्याचेंच काम आहे असें मी मानतों. इतकें मोठें आणि कठिण काम स्वतःच्या शक्तीवर अंगावर घेण्याची हिंमत माझ्यांत कुठली ? ज्या दिवशीं मला पहिलें दान मिळालें त्या रात्रीं मी विचार करीत होतों कीं, अशा रीतीनें दान मागून का मी साऱ्या गरीबांना जमीन देऊं शकणार आहे ? पण मला अंतरांतून शक्ति मिळाली. आंतून आवाज आला : भिऊं नकोस. जमीन माग. तेव्हां अशा रीतीनें मी माझ्या नव्हे ईश्वराच्या शक्तीवर हें काम सुरू केलें असल्यामुळें माझ्या मनांत असले प्रश्न उद्‌भवतच नाहींत. पण जेव्हां असा प्रश्न विचारला जातो, तेव्हां त्याला उत्तर हेंच कीं, जर माझें काम अयशस्वी झालें तर हिंसक क्रांति होईल. तेव्हां आतां क्रांति टळत नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

" पण ईश्वरच जर मला आज अशा तऱ्हेनें हिंडवीत आहे तर त्याचा अर्थ त्याच्या मनांत हिंसक नव्हे, अहिंसक क्रांतीच घडवून आणायची हा आहे. ईश्वराला जर साऱ्या सृष्टीचा संहारच करायचा असेल तर त्या वेळीं कुणाची बुद्धि ठिकाणावर राहील ? परंतु आज देशांतलें पोरसुद्धां भूदान-यज्ञाचें गीत गात आहे आणि हजारोंच्या संख्येनें लोक दान देत आहेत. तेव्हां भगवंताची इच्छा अत्यंत स्पष्ट आणि उघड आहे.

## ★ भूदान व सत्याग्रह

" दुसरी गोष्ट सत्याग्रहाची. माझें आज चाललेलें काम हा सत्याग्रहच

आहे. सत्याग्रहाचीसुद्धां एक कसोटी असते. सत्याग्रहाचा अधिकार मिळविण्याकरितां गरीबसुद्धां आपल्या मिळकतींतून दान करील; कारण फक्त गरिबी ही कांहीं सत्याग्रही होण्याला पुरेशी कसोटी नाहीं. शोषणा-व्यतिरिक्त गरीबीचीं दुसरींहि कारणें असूं शकतात. हा गरीबच जेव्हां जमीन देतो, तेव्हां नैतिकतेचें वातावरण निर्माण होतें. त्याला हा विशिष्ट विचार पटतो आणि त्याचा तो अंमल करतो. अंतिम सत्याग्रह कधीं लक्षांतच घ्यावा लागणार नाहीं, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. पण बापाच्या आजारांत मुलगा त्यावर उपचार करण्याचा विचार करतो, त्याच्या स्मशानाची तयारी करीत नाहीं. आणि बाप जर मेलाच तर त्या वेळीं अंत्येष्टीहि करतो बापडा. सत्याग्रह हा शेवट आहे. त्याच्या अगोदर पुष्कळ करावें लागतें. माझें जें कांहीं नांव आहे तें सत्याग्रही म्हणूनच आहे, हें तुम्हांला माहीतच आहे. सर्व कांहीं करून पाहिल्यानंतरसुद्धां जर मालकांनीं जमिनी सोडल्या नाहींत, तर लहान-मोठ्या भूदात्यांची आमची ही सरमिसळ सेना त्या वेळीं काम करील. आतांचीच गोष्ट घ्या. जमिनीवरून काढून टाकले-ल्यांच्या बाबतींत मीं सांगून टाकलें आहे कीं, जमीन कसणाऱ्यांनीं सर्व कांहीं सहन करावें, पण जमिनी सोडूं नयेत.

मीं समाजवाद्यांनाहि सांगितलें कीं, तुम्ही सत्याग्रह बंद करा आणि भूमिदान-यज्ञाच्या कामीं लागा. हेंसुद्धां सत्याग्रहाचेंच रूप आहे. खऱ्या सत्याग्रहांत दोघांचेंहि हित असतें. केवळ शत्रूच्याविरुद्धच सत्याग्रह कराव-वयाचा असें आपण समजतों. मुलांच्या भल्याकरितांच आई उपवास करते. खऱ्या सत्याग्रहाचें तसें स्वरूप असतें. अत्यंत निर्वैरतेनेंच सत्याग्रह होऊं शकतो. ”

— विनोबा

### ★ पण गरीब लोक किती दिवस आतां धीर धरून वाट पाहूं शकतील ?

“ मी लोकांना एका योग्य मार्गानें नेऊं इच्छितों आणि म्हणून आजची परिस्थिति लवकरांत लवकर बदलावी असें मला वाटतें. मला शांति पाहिजे, पण खऱ्या क्रांतीकरितां शांति पाहिजे. स्मशानशांति मला नको. स्मशानशांतीऐवजीं दुसरी वाटेल ती स्थिति मी सहन करीन. मी क्रांतीच्या

गोष्टी बोलतों. त्यामुळें मी भयंकर आहें असेंहि कोणीं म्हटलें. होय, मी भयंकर आहें खराच. पण अशा लोकांच्या बाबतींत कीं जे आजची स्थिति कायम ठेवूं इच्छितात, जे आपल्या जबाबदाऱ्या ओळखीत नाहींत, करायची वेळ आली असतांना जे करीत नाहींत आणि आपल्या थैल्यांचीं तोंडें बंद ठेवूं इच्छितात. ज्यांना ही समाजरचना बदलायची नाहीं त्यांच्या बाबतींत मी भयंकर अवश्य आहें.

" मी क्रांति अडवूं इच्छीत नाहीं, तर योग्य मार्गानें क्रांति करूं इच्छितों. गांधीजी एका वर्षांत स्वराज्य बोलले होते. त्यांनीं अहिंसेच्या मार्गानेंच लोकांना नेलें, त्यानें थोडा वेळ लागला तरी काय झालें ? लोक मला विचारीत असतात, ' रशियांत झटक्यांत काम झालें, चीनमध्येंहि तसेंच झालें, मग इथें कां होत नाहीं ? ' पण ते हें विसरतात कीं, तेथें प्रथम हिंसक क्रांति झाली आणि मागाहून काम झालें. लोक मला म्हणतात कीं, 'तुमच्या चळवळीनें गरीब जनतेंत असंतोष वाढेल आणि तिचा धीर सुटून ती हिंसेला प्रवृत्त होईल.' मला हिंसा नको. ती थांबविण्याकरितां तर ही माझी चळवळ आहे. पण मला स्मशानशांतीहि नको. माझ्या या चळवळीला जर जोर लागला, तर जमीन न देणाऱ्यांची संख्या पुष्कळ कमी राहील आणि कसल्याहि प्रकारच्या हिंसेची गरज राहणार नाहीं. म्हणून ज्यांना हिंसा नको त्यांनीं या चळवळींत सामील झालें पाहिजे. आज आहे हीच परिस्थिति जे कायम ठेवूं इच्छितात ते हिंसेंतून वाचूं शकणार नाहींत. मला हिंसा नको असली तरी आजची परिस्थितीहि मी सहन करूं शकत नाहीं. "

—विनोबा

**★ भूदान-आंदोलनांतून थोडी फार जमीन मिळेल, परंतु समाजाचा प्रश्न सोडविण्याचें सामर्थ्य ज्या तत्त्वज्ञानांत असतें असें तत्त्वज्ञान या आंदोलनाच्या मुळाशीं आहे काय ?**

" भूदान–चळवळींतून नुसती जमीन मिळाली तर त्याला गौण महत्त्व आहे महत्त्व आहे तें जमीन देणारा मिळाला का आणि तो किती मिळाला

याला. मनुष्यच जर मिळाला तर त्याचा अर्थ बाकीचें सर्व मिळालें असा आहे. मनुष्याचें हृदयपरिवर्तन करण्याजोगें या आंदोलनांत कांहीं आहे का हें पाहायचें आहे. नवीन समाज निर्माण करायचा याचा अर्थ मानवांतील आजचे परस्परांचे संबंध बदलून नवीन संबंधांनीं समाज उभा करायचा. खरी क्रांति हीच. अशी क्रांति घडवून आणण्याची शक्ति कांहीं निश्चित तत्त्वज्ञान मागें असल्याशिवाय कामांत निर्माण होणार नाहीं.

" जें दिसतें आणि घडतें त्याच्याशीं आपले संबंध काय आहेत हें सांगणारा विचार आणि त्यांतून निघणारा आपला धर्म मिळून ' तत्त्वज्ञान ' बनतें. ' ईशावास्यमिदं सर्वम् '– हें सर्व ईश्वरानें व्याप्त आहे, ईश्वराचें आहे, हा विचार जुनाच आहे. परंतु तो हृदयांत रुजून आचाराच्या रूपानें प्रकट झाला पाहिजे. समाजांतील परस्परांचे संबंध त्या विचारावर आधारलेले असले पाहिजेत. ' हें सर्व ईश्वराचें आहे ' यांतूनच ' तेन त्यक्तेन भुञ्जीथाः '–' त्याच्या नांवानें त्यागून भोगीत जा ' हा आपला धर्म निघतो. धर्म आणि जीवन यांची गांधींनीं अशी सांगड घातली, हा गांधींचा विशेष. यांतून अपरिग्रहाचा आचार सिद्ध होतो. सत्य-अहिंसेची सिद्धि अपरिग्रहाशिवाय होणार नाहीं हें भूदान-यज्ञ शिकवितो. अपरिग्रह म्हणजे नुसतें जास्तींत जास्त किंवा कमींत कमी किती आपल्याजवळ ठेवावयाचें एवढाच विचार नाहीं. याच्याहि पलीकडे सर्वोदय-विचाराची दृष्टि आहे. अपरिग्रहांत साऱ्या जीवनशक्तीच आणल्या आहेत. हें खरें तत्त्वज्ञान आहे. हें Applied Science म्हणजे व्यवहाराला लावून दाखविलेलें विज्ञान आहे. सत्य-अहिंसा ही जीवनाला लावून दाखवायची त्याचेंच रूप अपरिग्रह हें आहे. गांधींनीं सांगितलें कीं, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जमीनदार आपण होऊन आपली जमीन समाजाला अर्पण करतील. पण कसे अर्पण करतील ? त्याची प्रक्रिया काय ? ती भूदान-यज्ञानें दाखविली."

––शंकरराव देव

★ **अपहरण विरुद्ध अपरिग्रह**

" मी जो विचार आज रूढ करूं इच्छितों याच्या विरुद्ध समाजांत आज चालू असलेल्या विचाराला ' अपहरण ' म्हणतात. ' अपहरणा ' च्या

विचारावर विश्वास ठेवणारे मानतात कीं, व्यक्ति ही समाजाकरितां असते आणि समाजाकरितां व्यक्तीच्या संपत्तीचें अपहरण करण्यांत कांहीं दोष नाहीं; नव्हे, व्यक्तीच्या संपत्तीचें अपहरण करण्याला अडथळा करणारा विचारच मुळीं चूक आहे. आज या विचाराकडे जगांतील कित्येक देश आकर्षित झाले आहेत. याच्या विरुद्ध मी 'अपरिग्रहा'चा विचार ठेवतों. अपरिग्रह हा गांधी, विनोबा यांसारख्या संन्याशांकरितांच आहे आणि सामान्य लोकांकरितां परिग्रहच आहे असें बहुधा मानलें जातें. संन्यास हा अंतिम आदर्श म्हणून ते मानतात खरें, पण गृहस्थ जीवनांत परिग्रहच चालू ठेवतात. त्याचा मर्यादितच लाभ होणार. आज जगांत लोभाचें, परिग्रहाचें राज्य आहे. परिग्रहाच्या आवर्तीभोंवतीं असे कायदे उभे केले आहेत कीं, परिग्रह दोष मानला जात नाहीं. चोरीला आपण गुन्हा समजतों. पण जो संग्रह करून चोराला प्रेरणा देतो त्याच्या कृतीला चोरी मानीत नाहींत. उपनिषदांतल्या गोष्टींत राजा म्हणतो, "माझ्या राज्यांत कोणी चोर नाहीं, कोणी कंजूष नाहीं!" कारण कंजूषच चोराला जन्म देतात. चोरांना आपण तुरुंगांत पाठवितों आणि त्याच्या बापाला मोकळें ठेवतों. ते मात्र शिष्ट प्रतिष्ठित बनून गादीवर बसतात. हा कसला न्याय म्हणायचा? गीतेनेंसुद्धां यांनाच चोर म्हटलें आहे. पण आपण आज गीतेला संन्याशांची पोथी समजून तिच्यापासून संन्यासच घेतला आहे!

### ★ समाज हा नारायणस्वरूप

"यज्ञांत आहुति देण्याच्या वेळीं 'इंद्राय इदं, न मम'–'हें इंद्राकरितां आहे, माझें नाहीं'–असें म्हणतात; तसेंच आज आपण जें कांहीं उत्पादन करतों, मग तें शेतींत असो कीं कारखान्यांत असो, त्याविषयीं आपण म्हटलें पाहिजे कीं, 'समाजाय इदं, राष्ट्राय इदं, न मम'–'हें सर्व समाजाकरितां, राष्ट्राकरितां आहे, माझें नाहीं'–आपल्यापाशीं जें कांहीं असेल तें सर्व समाजाला अर्पण केलें पाहिजे. मग समाजाकडून आपल्या आवश्यकतेप्रमाणें जें कांहीं मिळेल तें अमृत होईल.

"आज जो धन कमावतो तो त्याबरोबर रोग आणि चिंता कमावतो. धन कमावून पुत्र, मित्र आणि शेजारी यांच्या प्रेमाला तो मुकतो. यामुळेंच

तो दुःखीहि आहे. आज समाजांत श्रीमंत आणि गरीब दोघेहि दुःखी आहेत. म्हणून ही समाजरचना बदलावी लागेल. मला परिवर्तन घडवून आणावयाचें आहे. प्रथम हृदयपरिवर्तन, नंतर जीवनपरिवर्तन आणि त्यांच्या पाठोपाठ समाजपरिवर्तन मला करावयाचें आहे.

" माझ्या कामाच्या बाबतींत गैरसमज करून घेऊं नका. हा एक धर्मविचार आहे. मनुष्याला आसक्तींतून सोडवून अपरिग्रही बनविणें हा माझा उद्देश आहे. म्हणूनच, जे मोठे मोठे परिग्रही आहेत त्यांच्यापाशींच दान मागायला जायचें असें नाहीं. आसक्ति काय, एका लंगोटीवरसुद्धां असूं शकते. म्हणून प्रत्येक व्यक्तीकडे जाऊन तिला हा विचार समजावून द्यायचा आणि दानपत्र मिळवावयाचें आहे. हीं दानपत्रें म्हणजे माझ्या विचाराला कबुली असल्याच्या पावत्याच होत.

### ★ सर्वोदयाकडे वाटचाल

" आजच्या वैज्ञानिक युगांत लोक नवीन पद्धतीनें विचार करूं लागले आहेत. नवे नवे विचार पुढें मांडले जात असतात. जुन्या शब्दांना नवीन अर्थ दिले जातात. परंतु त्यांतून अनर्थच होत आहे. कारण विज्ञानच अपूर्ण आहे. म्हणून त्यांतून निघालेले अपूर्ण मंत्र जगासमोर ठेवले जातात. पाश्चात्यांच्या अपूर्ण विज्ञानांतून असाच एक नवीन विचार निघाला आहे : " जास्तींत जास्त लोकांचें जास्तींत जास्त कल्याण " ( Greatest good of the greatest number ). असा तो विचार आहे. तो मोठा धोक्याचा आहे. आपण या विचारांत आपलें हित आहे असें मानतों. परंतु त्यांतूनच भेदासुराचा जन्म झाला आहे. अल्पसंख्य व बहुसंख्य हे संख्यासुर-सुद्धां या विचारांतूनच जन्मले. त्यांतूनच झगडे निर्माण झाले. हा विचारच अपुरा आहे. पूर्ण विचार असा कीं, सर्वांचेंच भलें झालें पाहिजे, केवळ जास्तींत जास्त लोकांचें नाहीं. कारण त्यामुळें समाजांतील अल्पसंख्य लोकांवर अन्याय होत असतो. आपल्या कुटुंबांत दहा माणसें असलीं तर नऊ लोकांचें कल्याण झालें म्हणजे बस्स, एकाचें नाहीं झालें तरी चालेल, असें कधीं आपण म्हणतों काय? परंतु समाजाचा विचार विज्ञानाच्या मार्गानें सुरू झाला तेव्हां अधिकाधिक लोकांच्या कल्याणाचें तत्त्व निघालें.

पण सर्वोदय सर्वांचेंच भलें चाहतो. विज्ञानाचा विचार अपूर्ण आहे, तर सर्वोदयाचा विचार पूर्ण आहे. त्यांत अल्पसंख्य-बहुसंख्याकांचा प्रश्न नाहीं. या विचाराचा एक पैलू घेऊन त्याचें आम्ही काम करीत आहोंत. भूमीचा प्रश्न हा सर्वोदय विचाराचा पायाभूत पैलू आहे. भूदान-यज्ञ हा केवळ आरंभ आहे. सर्वोदयाच्या मार्गावरील तें पहिलें पाऊल आहे. ''

—विनोबा

**★ महाराष्ट्रासारख्या रयतवारी पद्धत असलेल्या प्रांतांत भूदानाची आवश्यकता काय ? बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश किंवा हैद्राबाद या प्रांतांप्रमाणें आपल्या प्रांतांत मोठमोठे जमीनदार आहेत कोठें ?**

केवळ हजारों एकर जमीन असलेल्या बड्या जमीनदारांनींच भूदान-यज्ञांत जमीन द्यावयाची आहे या गैरसमजुतीवर ही शंका आधारलेली आहे. गरजेपेक्षां ज्यांच्यापाशीं अधिक जमीन आहे त्यांनीं आणि गरजेपेक्षां कमी असणाऱ्यांनींहि भूदान-यज्ञांत आपला हविर्भाग द्यावा, अशी भूदानाची मागणी आहे. कारण, वैयक्तिक मालकीची भावना काढून टाकून समाजस्वामित्वाची भावना या चळवळीनें निर्माण करावयाची आहे. त्यामुळें जमीनदारी असलेल्या प्रांतांइतकीच महाराष्ट्रांतहि भूदानाची गरज आहे. परंतु हा मुद्दा सोडला तरी महाराष्ट्रांत रयतवारी पद्धत असूनहि जमीनमालकीच्या प्रमाणांत समानता आहे असें मुळींच नाहीं. याबाबत वस्तुस्थिति काय आहे ती समजून घेतली पाहिजे :

( १ ) महाराष्ट्रांत ५० लाख एकर जमीन कुळांकडे खंडानें लावलेली आहे. म्हणजे एकूण शेतीखालच्या जमिनीच्या ३० टक्के जमिनीवर स्वत: न कसणाऱ्या लोकांची मालकी आहे, आणि हे गैरहजर मालक ३ लक्ष २ हजार आहेत.

( २ ) १०० एकरांहून जास्त जमीन असलेले जमीनमालक महाराष्ट्रांत १०,००० हजार आहेत आणि त्यांच्या मालकीची १७ लाख एकर जमीन आहे. उलट, स्वत:ची ५ एकरसुद्धां जमीन नाहीं असे खातेदार महाराष्ट्रांत

१० लाख आहेत आणि त्यांची मालकी फक्त २४ लाख एकरांवरच आहे. हेंच शेंकडा प्रमाणाच्या भाषेंत मांडावयाचें तर शेंकडा १० खातेदार ४४ टक्के जमिनींचे मालक आणि शें. ९० खातेदार उरलेल्या ५६ टक्के जमिनीचे लहान लहान मालक आहेत.

( ३ ) महाराष्ट्रांत एकूण शेती व्यवसायांत गुंतलेल्या १ कोटी १२ लक्ष लोकसंख्येपैकीं ७६ लक्ष ४१ हजार म्हणजे ६८ टक्के लोक जमिनीचे मालक-शेतकरी ( Peasant-Proprietors ) आहेत; १६ लक्ष ६२ हजार म्हणजे १५ टक्के मालक नाहींत पण कुळें म्हणून कसणारे आहेत; १५ लक्ष ४९ हजार म्हणजे १४ टक्के लोक निव्वळ शेतमजूर आहेत; आणि ३ लक्ष २ हजार म्हणजे ३ टक्के गैरहजर मालक आहेत, हें वर दिलेंच आहे.

तेव्हां ५ एकरांच्या खालचे १० लक्ष अर्धबेकार जमीनमालक, १६ लक्ष ६२ हजार मालक नसलेले शेतकरी आणि १५ लक्ष ४९ हजार शेतमजूर या सर्वांना पुरेशी जमीन मिळवून देण्याची जबाबदारी समाजांत शांति--स्वास्थ्य टिकावें म्हणणाऱ्यांवर आहे हें उघड आहे. भूदान-यज्ञानें हें काम करतां येईल. महाराष्ट्रांतसुद्धां भूदान-आंदोलनाची आवश्यकता किती आहे हें यावरून कळून येईल.

### ★ भूदान-यज्ञामुळें जमिनीचे आणखी लहान लहान तुकडे पडतील व शेतीचें उत्पादन घटेल. म्हणून भूदानाचा कार्यक्रम धान्योत्पादनवाढीच्या कार्यक्रमाशीं विसंगत नाहीं काय ?

" मला पांच कोटी एकर जमीन मिळवावयाची आहे. एवढी मोठी जमीन एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातांत जात असतां जमिनीचे कदाचित् तुकडे पडतीलहि. पण भूदानांतून निर्माण होणाऱ्या क्रांतीशीं तुलना करतां तुकड्यांबाबतचा हा प्रश्न अगदींच मामुली असून वस्तुतः व्यर्थच म्हटला पाहिजे. मला त्याबद्दल दुःख होत नाहीं. पण मानवी हृदयाची होत असलेलीं शकलें मात्र मला व्याकुळ करीत आहेत. तुकडे काय, परस्पराची सदिच्छा आणि सहकार्य वाढलें कीं पुन्हां जोडतां येतील; परंतु सामाजिक व आर्थिक विषमतेमुळें दुभंगलेलीं मानवी मनें पुन्हां जोडलीं नाहींत तर

आपल्यासारख्या देशांत तरी धोका आहे. आम्ही वस्त्र शिवण्यासाठींच तें कापीत आहोंत...दुसरी गोष्ट अशी कीं, जमिनीचें लहान लहान तुकडे झाल्यानें उत्पादन घटतें ही कल्पनाच मुळांत अनुभवास धरून नाहीं. या विषयावर नियोजन-समितीशींहि माझी चर्चा झाली होती. लहान तुकड्यांत भरपूर मेहनत मशागत केली तर पुरेसें धान्य उपजूं शकतें. माझें म्हणणें त्यांना पटलें."

—विनोबा

वस्तुस्थिति अशी आहे कीं, दानांत मिळणाऱ्या सर्वच जमिनीचे तुकडे पडलेले असतात, असें नाहीं. देणारा माणूस शक्यतों आधींच सलग तुकडा असलेली जमीन बहुधा देत असतो. जमिनीचे पुन्हां वांटप करतांना मिळालेल्या तुकड्यांची अदलाबदल करून एक पुरेसा प्लॉट एकत्र तयार करण्याचाहि प्रयत्न केला जातो.

लहान लहान तुकड्यांमुळें जमिनीची उत्पादनक्षमता घटतेच असें निर्विवादपणें म्हणतां येणार नाहीं. मोठ्या क्षेत्रावरील शेतींत उत्पादन अधिक होतें असें म्हणण्यापेक्षां ती अधिक किफायतशीर होते, तीवर अधिक नफा सुटतो, असें म्हणणें योग्य ठरेल. लहान तुकड्यांतच गरजे-इतकें उत्पादन करतां येतें असा अनुभव आहे. पवनारमधील आपल्या आश्रमांतील शेतींत आपल्या तरुण सहकाऱ्यांसह विनोबांनीं हा प्रयोग करून पाहिला आहे. जपानमध्यें एका एकरांत ६० ते ८० मण भात तेथील शेतकरी काढतात. कुदळ व खोरें यांच्या साहाय्यानें ते शेती करतात. अर्थात् शेती आंतबट्ट्याची होऊं नये म्हणून जेवढें किमान क्षेत्रफळ आवश्यक असेल तेवढ्या क्षेत्रफळाचा तुकडा भूदानांत मिळालेल्या जमिनींतून तयार करण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु व्यापारी शेतीला प्रोत्साहन देण्यासाठीं मोठमोठे प्लॉटस पाडले जाणार नाहींत.

भूदानामुळें जमिनीचें तुकडे पडण्याची भीति आज असली तरी पुढें असे जमिनीचे तुकडे पाडणें आपोआपच बंद होईल. कारण भूदानांतून मिळालेल्या जमिनींचे, ज्यास ती मिळाली त्याला तुकडे करतां येणार नाहींत. ती खासगी मालकीची राहिली असती तर कुटुंबांतील भाऊ-

दिल्यामुळें पुढील पिढयांत त्यांचे अधिक तुकडे पडण्याची भीति राहिली असती.

प्रत्येक कष्टाळू शेतकऱ्याला त्याच्या मालकीची जमीन मिळवून दिली तर तो आपल्या शेतांत अधिक जीव ओतून काम करील, अधिक मेहनत-मशागत करून जमीन पिकवील. तेव्हां भूदानानें उत्पादन घटण्यापेक्षां तें वाढण्यासच मदत होण्याची शक्यता अधिक आहे. मिरज तालुक्यांतील म्हैसाळ गांवच्या श्री. माने नांवाच्या एका उद्यमी शेतकऱ्यानें आपल्या ६ गुंठे जमिनींतून कुदळीनें खणून शेती करून १००० रु. चें उत्पन्न काढल्याची हकीगत प्रसिद्ध झाली आहे. चीनमध्यें क्रांतीनंतर जमीन वांटली गेली आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, लोकांनीं आपल्या वांट्याला आलेल्या जमिनींतून जास्तींत जास्त पीक काढण्याच्या ईर्ष्येनें स्वतःच्या श्रमानें एका वर्षांत पांच हजार मैलांचे कालवे काढले. चीनमध्यें जमीनवांटपानंतर उत्पादन इतकें वाढलें कीं, तेथील परंपरागत दुष्काळ त्यामुळें नाहींसा झाला. आज आपल्या जमिनीची अशी स्थिति आहे कीं, मालकांना सरकारच्या कायद्यामुळें आज ना उद्यां आपल्या ताब्यांतील जमीन जाणार असल्याची भीति वाटत असल्यानें ते जमिनीकडे लक्ष देत नाहींत; तर कुळांना ती आपल्याकडेच राहील अशी शाश्वती वाटत नसल्यानें तिच्यांत अधिक राबून जास्त उत्पादन करावें असें वाटत नाहीं. मजुरीवर काम करणारे शेतमजूर तर बोलून चालून सांगितल्या कामाचे धनी. ते राबतात त्या जमिनीवर त्यांचा मालकीहक्क नसल्यानें त्यांना तिच्यासंबंधीं कांहींच आस्था वाटत नाहीं. अशा रीतीनें जमिनीकडे आज कोणाचेंच लक्ष नाहीं. मग ती पीक देणार कशी ?

**★ ‘ कसेल त्याची जमीन ’ याऐवजीं ‘ पिकवील त्याची जमीन ’ हें तत्त्व कां मानलें जाऊं नये ? त्या दृष्टीनें लहान प्रमाणावर शेती करण्यापेक्षां मोठमोठीं फार्म्स ( शेतीवाड्या ) बनविण्याकडे रोख असावा.**

‘ पिकवील त्याची जमीन ’ हें तत्त्व मानून मोठमोठीं फार्म्स करण्यानें उत्पादन वाढेल ही गोष्ट खरी आहे. परंतु आजचें अर्थशास्त्र सांगतें कीं,

केवळ उत्पादनवाढ हा दैन्यावर आणि बेकारीवर तोडगा नाहीं. क्रयशक्ति वाढली तरच उत्पादनवाढीचा उपयोग. माणसाची क्रयशक्ति त्याचा उत्पादनक्रियेशीं संबंध जोडल्यानेंच वाढणार आहे. मोठमोठ्या कारखान्यांप्रमाणें मोठमोठे शेतीचे कारखाने काढले आणि, ते परवडण्यासाठीं अर्थात् यंत्रसामग्रीचें साहाय्य अपरिहार्यपणें घ्यावें लागणारच, तें घेऊन उत्पादन वाढविलें तरी उत्पादित माल जी जनता उपभोगणार ती बेकार राहिल्यामुळें खरेदी करण्याची तिला शक्ति असणार नाहीं. माल पडून राहील, कुजेल, नष्ट होईल, जाळून टाकला जाईल आणि लोकहि उपाशी मरतील. अर्थशास्त्राचा हा सिद्धान्त मार्क्सनें दाखवून दिल्यानंतरसुद्धां तो आपण कसा दृष्टिआड करूं शकतों?

मोठीं फार्म्स बनूं शकतील, पण तीं श्रमणाऱ्या शेतकरी मालकांनीं स्वखुषीनें एकत्र येऊन. त्या सहकार्यानें त्यांचा फायदाहि होईल. पण श्रमणाऱ्यांना अगोदर मालक तर बनूं द्या. मग आपोआपच त्यांना सहकार सुचेल, रुचेल.

**★ दान मिळालेली जमीन भूमिहीनांना वांटतांना कसण्यास परवडेल एवढी जमीन देणें उचित नाहीं काय? प्रत्येकीं ५ एकर जमीन देण्यानें बिनकिफायतशीर तुकड्यांच्या संख्येंत भर पडणार नाहीं काय?**

"महाराष्ट्रांत आज ५ एकरांहून कमी जमीन असलेले शेतकरी सुमारें १० लाख असून त्यांच्याकडे २४ लाख एकर जमीन आहे. ५२ टक्के शेतकरी प्रत्येकीं सरासरी २॥ एकर जमीन कसतात हा त्याचा अर्थ आहे. यांतील कांहीं शेतकरी एकाहून अधिक छोटे तुकडे कसत असतील व कांहींजण छोट्याशा तुकड्यावरील शेतीस जोडून कांहीं अन्य व्यवसाय करीत असतील.

महाराष्ट्राची लोकसंख्या १ कोट ६५ लाख असून ग्रामीण लोकसंख्या १ कोटी २३ लाख आहे. पिकांखालील क्षेत्र १ कोटी ९९ लाख एकर आहे. एकूण लोकसंख्येच्या दर डोई १। एकर अशी जमिनीची सरासरी पडते. ५ माणसांच्या कुटुंबाला ६ एकरांहून जास्त जमीन वांट्यास

येतच नाहीं. अन्नधान्यें व कडधान्यें यांखालीं १ कोटी ५२ लाख एकर जमीन आहे त्या जमिनींतून पाऊसमान बऱ्यापैकीं असलेल्या वर्षीं २५ लाख टन धान्य पैदा होतें. ६ एकरांस १ टन धान्य असें हें प्रमाण पडतें. रोज माणशीं १ पौंड या हिशेबानें ६ जणांस वर्षाला १ टन धान्य लागतें. महाराष्ट्रांतील जमिनीचा सरासरी मगदूर लक्षांत घेतां केवळ उदरपूर्तीसाठीं ५ माणसांच्या एका कुटुंबास सरासरी ६ एकर कोरडवाहू जमीन लागेल.

अमुक क्षेत्र असलें म्हणजे ती जमीन परवडण्यासारखी असते असें ठोकळेबाज उत्तर देणें कठिण आहे. जमिनींतील मातीचा दर्जा, पाऊसमानाचें प्रमाण, हंगामशीरपणा व पाणी-पुरवठा इ० गोष्टींचा त्यांत विचार करावा लागतो. कोरडवाहू ५ एकर किंवा बागायत १ एकर जमीन एका भूमिहीन कुटुंबास देण्याची भूमिदानयज्ञांत स्थूल योजना आहे. देशांतील नैसर्गिक साधनसंपत्ति व मनुष्यबळ यांचा मेळ घालण्याचा त्यांत प्रामुख्यानें विचार आहे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. संपत्तिउत्पादनाच्या उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांचें लोकसंख्येच्या प्रमाणांत समान व न्यायोचित विभाजन करून बेकारी व उपासमार टाळणें क्रयशक्तीची अधिक चांगल्या प्रकारें विभागणी करून पर्यायानें देशाच्या अर्थघडीला सुस्थिरता प्राप्त करून देणें हीं उद्दिष्टें भूदान-यज्ञानें साध्य होण्यासारखीं आहेत.

कोंकण, मावळ व देश अशा महाराष्ट्राच्या तीन टप्प्यांत अनुक्रमें १०, २० व ३० एकर जमीन हें परवडण्यासारखें क्षेत्र ( Economic Holding ) होईल असें तज्ज्ञांचें मत आहे. या हिशोबानें पाहिल्यास आज फक्त २० टक्के लोकांकडेच असें क्षेत्र आहे. प्रत्येक कुटुंबास २० एकर जमीन द्यावयाची म्हटल्यास फक्त ९ लाख कुटुंबांची सोय लागूं शकेल. मग बाकीच्यांचें काय? परवडण्याइतकें क्षेत्र ही कसोटी ठेवणेंच अशक्य आहे.

जमिनीचा मगदूर सुधारणें, बांध-बंदिस्ती व छोट्या-मोठ्या पाणी-पुरवठ्याच्या योजना अंमलांत आणणें यायोगें उत्पादनक्षमता वाढविली तर ५ एकर जमीनहि परवडणारें क्षेत्र होणें अशक्य नाहीं. गरज ही शोधाची जननी आहे. एवढी जमीन माझी आहे व त्यावरच उपजीविका चालविली

पाहिजे, अशी शेतकऱ्याची खात्री झाली म्हणजे मार्ग निघूं शकेल. जपानांत तर २॥ एकर जमीन हें परवडणारें क्षेत्र आहे. उत्तर प्रदेश व बंगालमध्यें एकरीं $\frac{3}{4}$ टन ( १५०० ते २००० पौंड ) धान्य पिकतें, तर महाराष्ट्रांत फक्त ३७५ पौंड ( $\frac{1}{6}$ टन ) पिकतें. शिवाय महाराष्ट्राचा ३० टक्के प्रदेश दुष्काळी व ३५ टक्के प्रदेश निमदुष्काळी आहे. १० वर्षांतून १ साल दुष्काळाचें व २ साल अवर्षणाचीं जातात. ही परिस्थिति सुधारणें व उत्पादन वाढविणें यांसाठीं कार्योद्युक्त होण्यास जरूर तें भावनाबळ जनतेंत निर्माण झालें पाहिजे. जमिनीच्या समान वांटपाच्या द्वारें तें निर्माण केलें जाऊं शकेल.

दान मिळालेल्या जमिनींतून तुकडेजोड करणें शक्य होईल. फार लहान तुकडे जोडून ५ एकर 'मूळ' तुकड्याएवढें क्षेत्र करतां येईल. भूदान-यज्ञ ही एखादी यांत्रिक व ठोकळेबाज चळवळ नसून जनतेच्या सुप्त विवेक-शक्तीला, न्यायबुद्धीला व आत्मप्रत्ययाला तें आवाहन आहे ही महत्त्वाची गोष्ट नजरेआड होऊं देतां कामा नये.

### ★ दान मिळालेल्या जमिनींतील बहुतांश जमीन वरकस आणि हलक्या दर्जाची असते. ही जमीन भूहीनांना देऊन काय फायदा ?

हा प्रश्न अपुऱ्या माहितीमुळें व मनांत कांहीं तरी पूर्वग्रह ठेवून विचारला जातो. आज भूदानांत सुमारें ३५ लाख एकर जमीन मिळाली आहे. ती काय सर्व निरुपयोगी म्हणावयाची ? बिहार-राजस्थानमधील दहा-पांच तरी मोठमोठ्या जमीनदारांनीं प्रत्येकीं १ लाखापेक्षां अधिक एकर जमिनीचीं दानें दिलीं आहेत. ती सर्वच जमीन बेकार आहे असें म्हणणें वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. ५० सबंध गांवेंच भूदानांत मिळालीं आहेत; त्या गांवांतील सारीच जमीन काय वरकस आहे ?

कांहीं जमीन खराब व निकृष्ट असणें शक्य आहे, स्वाभाविक आहे. भूदानानें स्वतःजवळ असेल तें समाजाकरितां देण्याची भावना वाढवावयाची आहे. म्हणून दात्यानें दिलेली जमीन, मग ती कशीहि असो, स्वीकारून त्याच्या भावनेला प्रतिसाद दिला जातो. दात्यावर विश्वास

ठेवला पाहिजे. त्यानें दिलेल्या जमिनीची चिकित्सा करणें योग्य होणार नाहीं. कांहीं लोक लोकलज्जेसाठीं किंवा संकट टाळण्याकरितां निरुपयोगी जमिनी देऊन टाकीत असतील, नाहीं असें नाहीं. परंतु जमिनीचा प्रश्न संपूर्णपणें सुटेपर्यंत भूदान-यज्ञ चालणार आहे. त्या दात्यांकडे जमीन मागावयास पुन्हां पुन्हां जावें लागेल. आज ना उद्यां दात्याला स्वतःची चांगली जमीन द्यावीच लागेल.

आणि योजकत्व असलें तर कोणतीच जमीन निरुपयोगी म्हणून फुकट जाणार नाहीं. कंपोस्ट खताचे खड्डे, गांवासाठीं संडास, निर्वासितांसाठीं घरें, शाळा, ग्रामपंचायत-कचेरी, दवाखाना, जंगल व चराऊ रानें वाढविणें वगैरे अनेक ग्रामोपयोगी कार्यांसाठीं या जमिनीचा उपयोग करतां येईल.

**★ प्रत्येक भूहीनाला स्वतःच्या मालकीची जमीन करून देऊन सहकारी शेतीच्या मार्गांत भूदानानें अडथळाच निर्माण केला जात नाहीं काय ? शेतकऱ्यांतील मालकी हक्काच्या स्वाभाविक भावनेला भूदानानें उत्तेजनच मिळेल.**

भूदान-यज्ञाच्या पुरस्कर्त्यांचा सहकारी शेतीला मुळींच विरोध नाहीं. फक्त सहकारी शेतीला आज अनुकूल काळ नाहीं असें त्यांचें मत आहे. तेलंगणांत प्रथम विनोबांना भूदान मिळालें तेव्हां त्यांच्यासमोर सहकारी शेतीचीच कल्पना होती. परंतु विचारांतीं व अनुभवांतीं सहकारी शेतीला आवश्यक असलेलें वातावरण व पूर्वतयारी आज नाहीं अशी त्यांची खात्री झाली. म्हणून त्यांनीं तो विचार सोडला. ते म्हणतात, " सहकार्याचा प्रयोग शेतीमध्यें यशस्वी होईल अशी माझी खात्री आहे. पण हा प्रयोग युक्तीनें आणि हिशेबानें करावयास पाहिजे. सहकारी पद्धतीनें शेती केल्याशिवाय हिंदुस्थानचा उद्धार होणार नाहीं. मला तें मान्यच आहे. परंतु मी आपल्याला विचारतों कीं, ज्यांना अशा जमिनी हयातींत अजून कधीं मिळाल्याच नाहींत, ज्यांना या पद्धतीची ओळख नाहीं, गणिताचा अगर हिशेबाचा गंधहि नाहीं, त्यांच्यावर सहकारी शेतीपद्धति लादणें हिताचें होईल काय ? "

भूदानांत मिळालेली सर्व जमीन सहकारी पद्धतीनेंच करावयाचें ठरलें तर ज्या हजारों सोसायट्या निघतील त्या चालवावयास लागणारी तज्ज्ञ मंडळी एकदम आणावयाची कोठून ? त्याच्या अभावीं सोसायट्या निघणार नाहींत. गेल्या पांच वर्षांत मुंबई राज्यांत फक्त नव्वद सहकारी-शेती सोसायट्या निघाल्या आणि त्यांखालीं फक्त सहा हजार एकरच जमीन येऊं शकली. त्यांपैकीं हाताच्या बोटांवर मोजतां येतील एवढ्या सोसायट्याहि कार्यक्षमतेनें काम करीत नाहींत, असा अनुभव आहे. या गतीनें देशांतील पांच कोटी भूहीनांचा प्रश्न सहकारी पद्धतीनें सोडवावयास किती काळ जाईल याची कल्पनाच केलेली बरी. अर्थात् भूदान मिळविलेल्या भूहीनांनीं सहकारी पद्धतीनें शेती करूंच नये असा कांहीं दंडक नाहीं. शक्य असेल तेथें त्यांनीं अवश्य सहकार करावा आणि ते करतीलहि. पांच कुटुंबें मिळून एक-दोन बैलजोड्या एकत्र ठेवून ते काम करून घेऊं शकतात. प्रत्येक शेतकऱ्यानें आपापल्या जमिनीची स्वतंत्र राखण करण्यापेक्षां संयुक्तपणें तें काम होऊं शकेल. बीं-बियाणें व अवजारें यांसाठींहि ते एकत्र येऊं शकतील. याप्रमाणें भूदानांत जमीन मिळालेल्या भूहीनांचें अनेक बाबतींत सहकार्य व्हावयास हरकत नाहीं.

**★ भूदानानें भूहीनाला जमीन मिळवून देतां येईल. पण नुसती जमीन घेऊन तो तिचें काय करणार ? बैल, बीं-बियाणें आणि अवजारें नसतील तर ती शेती पडूनच नाहीं का राहणार ?**

भूहीनाला केवळ जमीन देऊन भागणार नाहीं हें खरें आहे. त्याला इतर शेतीसाधनेंहि मिळवून देण्याचा भूदानाचा प्रयत्न आहे. ज्यांच्या-जवळ जमीन नसेल त्यांच्याकडून यासाठींच नांगर, बैलजोड्या, बीं-बियाणें यांचेंहि दान मागितलें जातें. याला '**साधनदान**' म्हणतात. भूदानाबरोबर याहि प्रकारचें दान आजवर अनेक ठिकाणीं मिळालें आहे. बिहारांत विहिरींचीं दानेंहि मागितलीं गेलीं. तेथें कित्येक धनवान भगिनींनीं आपल्या अंगावरचे दागिने या कामासाठीं दिले आहेत. त्यांच्या पैशांतून भूहीनांच्या जमिनींत विहिरी खणल्या जातील. '**संपत्तिदाना**'ची

मागणी विनोबा भूहीनांना साधनें घेऊन देण्यासाठींच प्रामुख्यानें करीत असतात. '**श्रमदाना**'ची मागणी त्यासाठींच आहे. गांवांतल्या ज्यांना कांहींच देतां येत नसेल त्यांनीं भूहीनांची जमीन सुधारून देण्यासाठीं श्रम द्यावेत अशी ही कल्पना आहे. विनोबाजींची अशी श्रद्धा आहे कीं, एकदां गांवांतील मोठ्या शेतकऱ्यांनीं प्रेमानें व न्यायबुद्धीनें भूहीनांना जमीन दिली कीं, ते आपोआपच त्यांना या जमिनीवर वसविण्याकरितां इतर मदतहि करतील. सरकारचेंहि या बाबतींत कर्तव्य आहे. परंतु विनोबांचा विश्वास जनतेच्या सद्‌भावनेवर व बंधुतेवर आहे. म्हणून ते म्हणतात, "मला मिळालेली जमीन काय सरकारनें दिली आहे? जनतेनेंच दिली. तीच जनता इतर साधनेंहि देईल."

## ★ भूदान-यज्ञानें देशांतील जमिनीचा सबंध प्रश्न सुटेल असा दावा करणें कितपत योग्य होईल?

'भूदान-यज्ञानें देशाचा जमिनीचा प्रश्न सुटणार नाहीं' असें ज्या वेळीं म्हटलें जातें त्या वेळीं भूदानाची चळवळ म्हणजे जमीन मिळवून ती वांटण्याची चळवळ एवढाच अर्थ घेतला जातो, असें दिसतें.

हिंदुस्थानांत जमिनीच्या बाबतींत फार गुंतागुंत आणि एक प्रकारचें अराजक आहे. तेव्हां जमिनीचा प्रश्न सुटायचा याचा अर्थ, जमिनीच्या मालकींत न्याय आणायचा, हाच प्रामुख्यानें समजला जाणें स्वाभाविक आहे. प्लॅनिंग कमिशनच्या अहवालांत विनोबांचा खास उल्लेख करून, कायद्यानें जें साधतां येणार नाहीं तें भूदान-यज्ञानें साधण्याची संभाव्यता निर्माण केली आहे, असें गौरवपूर्वक म्हटलें आहे. जमीन हा या देशाचा आद्य आधार आहे. म्हणून जमिनीचा प्रश्न सोडविणें या विषयाची व्याप्ति फार मोठी आहे.

जमिनीचा प्रश्न सोडवावयाचा म्हणजे—

( १ ) जमिनीवरील खासगी मालकी नष्ट होऊन जमीन सबंध गांवाची होणें, ( २ ) जमिनींत श्रम करणाऱ्या व्यक्तीचें, कुटुंबाचें वा समूहाचें कोणाचेंहि शोषण न होतां आणि जमिनीच्या कसाची हानि न होऊं देतां जमिनीचें उत्पादन अधिकांत अधिक वाढेल अशी व्यवस्था करणें,

( ३ ) व्यक्ति, कुटुंब वा समूह स्वतःच्या श्रमानें जेवढ्या जमिनीची मशागत करूं शकेल त्यापेक्षां अधिक जमीन त्याच्याकडे लागवडीसाठीं न राहणें, ( ४ ) शेतीच्या कामांत कोणी कोणाचे श्रम विकत न घेतां श्रमांची देवघेव सहकारी तत्त्वावरच होईल असा नियम प्रस्थापित करणें, ( ५ ) जमिनींतील उत्पादनावर ती कसणाऱ्याचाच हक्क राहील अशी व्यवस्था करणें, ( ६ ) गांवाच्या आणि देशाच्या धारणेसाठीं आणि उत्कर्षासाठीं या उत्पन्नापैकीं जो हिस्सा जमीन कसणारानें द्यावयाचा तो त्यानेंच सरळ गांवाला किंवा सरकारला द्यावा, त्यांत कोणी मध्यस्थ असूं नये अशी व्यवस्था घडवून आणणें, ( ७ ) गांवाच्या अन्नवस्त्रादि प्राथमिक गरजा भागविण्याच्या दृष्टीनें गांव स्वावलंबी होईल अशा रीतीनें गांवाची शेती आंखणें आणि त्याकरितां जरूर तेथें गांवाचे गटहि पाडणें, ( ८ ) गांवांतील सर्व व्यावसायिकांचा शेतीच्या कामाशीं प्रत्यक्ष संबंध येईल अशा रीतीनें जमिनीची विभागणी व व्यवस्था करणें.

—या व अशा गोष्टी हातीं घेऊन त्या पार पाडाव्या लागतील. माणसामाणसामधील जिव्हाळा, श्रमविभागणी, सहकार, समानता हीं सर्व टिकतील अशी रीत या जमिनीच्या प्रश्नाच्या सोडवणुकीशीं संबंधित आहे. थोडक्यांत म्हणजे हा नवीन समाजरचनेचाच प्रश्न आहे. या दृष्टीनें विचार केला म्हणजे भूदान-आंदोलनानें निर्माण केलेलें वातावरण नवीन समाजरचनेकडे लावल्यावांचून भूदान-आंदोलनाची परिसमाप्ति होत नाहीं, हें सहज दिसेल.

## ★ भूदान-यज्ञाबद्दल सरकारचें काय धोरण आहे ? सरकारी सहाय्य कोणत्या प्रकारचें मिळतें ?

भूदान-यज्ञाला सरकारचा पूर्ण पाठिंबा आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांतील प्रमुख मंत्र्यांनीं आणि भारताच्या राष्ट्राध्यक्षांनीं वेळोवेळीं त्याचा पुरस्कार केला आहे. पंचवार्षिक योजनेंतहि भूदानाचा पुरस्कार करण्यांत आला आहे. मध्यभारत, उत्तरप्रदेश, राजस्थान वगैरे ठिकाणच्या सरकारांनीं आपल्या मालकीच्या पडित जमिनीहि भूदानांत दिल्या आहेत. याशिवाय भूदानांत जमिनीचे व्यवहार कायदेशीर करणारे कायदे

मध्यभारत, उत्तरप्रदेश, विंध्यप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, हैद्राबाद, बिहार, ओरिसा या राज्यसरकारांनीं केले आहेत. या कायद्यानें भूदानप्राप्ति व वांटप कायदेशीर करण्याची तरतूद केली जाते. वांटपाच्या कामीं सरकारी यंत्राचें साहाय्यहि मिळतें. जमिनीचा व्यवहार करतांना द्यावी लागणारी स्टँप ड्यूटी, कोर्ट फी, रजिस्ट्रेशन फी माफ करण्यांत येते. मुंबई राज्यांत असा कायदा करण्याचा विचार चालू आहे, असें नुकतेंच मुंबईच्या महसूल मंत्र्यांनीं जाहीर केलें आहे.

**★ भूदानांत मिळालेल्या जमिनीचें वांटप कसें केलें जातें ? ज्यांना जमिनीची खरोखरी आवश्यकता आहे, त्यांनाच ती मिळेल आणि वशिलेबाजी किंवा दड-पणाचा वापर केला जाणार नाहीं याची खात्री काय ?**

देशांतील जमिनीचें आजचें अन्याय्य वांटप नाहींसें करून न्याय्य विभागणी करण्यासाठीं तर भूदान-यज्ञ आहे. या थोर हेतूला बाधा येणार नाहीं अशी भूदानांत मिळालेल्या जमिनीचें वांटप करतांना कटाक्षानें काळजी घेतली जाते. विनोबांनीं स्वतःच वांटपाचीं तत्त्वें व पद्धति स्थूल-मानानें आंखून दिली आहे. त्यानुसार जमिनीचें वांटप होतें. ज्यांच्यासाठीं भूदान-यज्ञ आहे त्या भूहीन गरीब शेतकऱ्यांनीं परस्परांची गरज ओळखून निर्लोभीपणानें जमीन वांटून घ्यावी हें साधें व सरळ तत्त्व वांटपांत मुख्यतः आहे. म्हणून वांटपाचें काम भूहीनांनींच करावें, कार्यकर्त्यांनीं त्यांना फक्त मार्गदर्शन करावें असें विनोबांचें धोरण आहे.

वांटपासाठीं एक मध्यवर्ती प्रांतीय समिति विनोबांच्या संमतीनें निवडली जाते. कोणत्याहि राजकीय पक्षाची किंवा एखाद्या गटाची ती नसते. सर्व पक्षांना प्रतिनिधित्व देऊन ती बनविलेली असते असेंहि नाहीं. निरपवाद सचोटीच्या कार्यकर्त्यांची ती असावी अशी मात्र विनोबा काळजी घेतात. या समितीच्या नियंत्रणाखालीं वांटपाचें काम चालतें. प्रांतिक सरकार या समितीस व तिनें केलेल्या जमीनविषयक व्यवहारास कायदा करून मान्यता देतें. कायद्यानें वांटपाचें काम सुलभ होत असल्यानें ज्या प्रांतांत भूदान-विषयक कायदा केला गेला असेल तेथेंच बहुधा प्रथम वांटप केलें जातें.

त्याचप्रमाणें या कामासाठीं शेंकडों कार्यकर्त्यांची गरज लागते; वांटतां येईल इतकी जमीन मिळालेली असावी लागते. ही परिस्थिति जेथें असेल तेथें वांटपाचें काम सुरू होतें. वांटपाची पद्धत सामान्यपणें पुढीलप्रमाणें असते :

## ★ वांटपाची पद्धत :

ज्या गांवांत जमीन वांटावयाची असेल त्या व आसपासच्या गांवांतील लोकांना सात दिवस अगोदर दवंडी पिटून वांटपाच्या कार्यक्रमाची तारीख व जागा कळविली जाते. या सात दिवसांत वांटप करणारे कार्यकर्ते दान मिळालेल्या जमिनीची व तिच्या मगदुराची पहाणी करतात आणि पांच माणसांच्या एका शेतकरी कुटुंबाला निर्वाहासाठीं किमान किती जमीन देणें जरूर आहे याचें प्रमाण तज्ज्ञांच्या सल्ल्यानें निश्चित करतात. सर्व-साधारणपणें एका कुटुंबास १ एकर बागायत किंवा ५ एकर जिरायत जमीन दिली जावी अशी कल्पना आहे. प्रत्येक प्रांतांत तेथें मिळालेली एकूण जमीन व तिचा दर्जा पाहूनच हें प्रमाण ठरविलें जातें.

जाहीर सभेंत वांटपाचें काम केलें जातें. संबंधित सरकारी खात्याचे अधिकारी यांना वांटपाच्या दिवशीं हजर राहण्याची विनंति करण्यांत येते. गांवांतील सर्व लोक जमतात. दान देणारे व दान हवे असलेले दोन्ही हजर राहतात. त्या सर्वांना भूदानामागील विचार, वांटपाची पद्धत व धोरण स्पष्टपणें समजावून सांगितलें जातें. भूहीनांना उठून उभें राहण्यास सांगितलें जातें. सभेंतील सर्वजण त्याच किंवा जवळपासच्या गांवांतील असल्यानें कोणी खोटेपणानें भूहीन म्हणून उभा राहूं शकत नाहीं. शिवाय महसूल खात्याचे अधिकारी सभेंत हजर असल्यानें खरे भूहीन कोण हें ओळखणें कठिण जात नाहीं.

शेती करूं शकणारे व इच्छिणारे, शेतीशिवाय उदरनिर्वाहाचें दुसरें साधन नसलेले, परंतु स्वतःची शेती नसल्यानें दुसऱ्याकडे राबणारे शेतमजूर यांनाच प्रथम जमीन देण्यांत येते. ह्या मिळालेल्या जमिनीचा निदान तिसरा हिस्सा हरिजन शेतमजुरांना देण्याचा प्रयत्न असतो. त्यानंतर केवळ

जमिनीवर गुजराण करणारे परंतु जमीन फारच थोडी असलेल्या गरीब शेतकऱ्यांचा विचार केला जातो. या तीन प्रकारच्या वर्गांना देऊन जमीन उरली; तर ती सामुदायिकपणें करावी असा सामान्यपणें संकेत आहे. फार मोठ्या प्रमाणांत जमीन मिळाली असेल, तर नवीन गांवें वसविण्याचीहि योजना करतां येते.

वांटप करतांना निर्णय घेणें कठिण झालें तर भूहीनांनींच एकमतानें आपल्यांतून योग्य माणसें ठरवावीं अशी अपेक्षा असते. तें शक्य झालें नाहीं, तर मग चिठ्या टाकून निकाल केला जातो. मिळालेली जमीन भूहीनानें स्वतःच कसली पाहिजे आणि दान दिल्यापासून तीन वर्षांच्या आंत ती लागवडीखालीं आणली पाहिजे, नाहीं तर ती त्याच्याकडून काढून घेतली जाते. ती त्याला विकतां येणार नाहीं, गहाण टाकून किंवा इतर रीतींनीं तीवर बोजा करतां येणार नाहीं.

### ★ भूदानाचें संयोजन कोण करतें ?

या आंदोलनासाठीं विनोबांनीं स्वतंत्र संघटना किंवा पक्ष उभारलेला नाहीं. तसें ते करूं इच्छीत नाहींत. ज्यांना पटत असेल त्या सर्वांनींच या कामांत यावें अशी त्यांची अपेक्षा आहे. म्हणून सर्वांना मोकळेपणानें काम करतां येईल, अशा प्रकारें या कार्याची व्यापक संघटनात्मक बैठक आहे. ‘ अखिल भारतीय सर्व सेवा संघ ’ ही सर्वोदयवादी मध्यवर्ती संस्था देशांतील भूदानाच्या कार्याचें मार्गदर्शन व संयोजन करते. बहुतेक सर्व प्रांतांत या संस्थेशीं संबंध असलेले सर्वोदयवादी कार्यकर्तेच त्या त्या प्रांताच्या कामाचें संयोजन करतात. त्यांच्या साहाय्याला भूदानास पाठिंबा असलेल्या व्यक्तींची मध्यवर्ती समिति विनोबांच्या संमतीनें नेमली जाते.

महाराष्ट्रांत ‘ महाराष्ट्र सेवा संघ ’ ही विधायक कार्यकर्त्यांची संस्था भूदान-कार्याचें संयोजन करते. एक प्रांतीय भूदान समितीहि स्थापन करण्यांत आली आहे. या समितीच्या सल्ल्यानें जिल्ह्याजिल्ह्यांतील समित्या स्थापन करण्यांत आल्या आहेत.

## ★ संपत्तिदान-यज्ञाचा अर्थ आणि त्याचें स्वरूप काय ? संपत्तिदानाचा विनियोग कसा होतो ?

संपत्तिदानाचें मूळ तत्त्व 'संपत्ति सब रघुपति कै आही' (सारी संपत्ति परमेश्वराची आहे) हें आहे. आपण आपल्या व्यक्तिगत प्रयत्नांनीं आणि बुद्धिकौशल्यानें जरी ती मिळविली असली तरी ती आपल्यासाठींच नाहीं, ती संपादन करण्यामागें लागलेली शक्ति आणि प्रेरणा तीच मुळीं ईश्वराची म्हणजेच समाजाची समजून ती समाजाच्या सेवेला लावली पाहिजे हा त्याचा अर्थ आहे.

विनोबा म्हणतात :

"संपत्तिदानांतून एक गोष्ट आम्हांला दाखवायची आहे. ती ही कीं, अपरिग्रह ही सामाजिक हिताकरितां उपयोगी पडणारी शक्ति आहे. अपरिग्रहानें व्यक्तीची आत्मशुद्धि होते हें पूर्वींपासून आपल्याला माहीत आहे. परंतु समाजाच्या कल्याणाचें प्रभावी साधन म्हणूनहि तो उपयोगी पडतो. आध्यात्मिक उन्नतीकरितां तो उपकारक आहे, एवढेंच नव्हे तर, ऐहिक जीवनसुद्धां उन्नत आणि संपन्न करण्याला त्याची मदत होऊं शकते. गांधी-स्मारक-निधीनें १० कोटी रुपये जमविले. पण गरज इतकी मोठी आहे कीं, १०० कोटी रुपयेसुद्धां पुरणार नाहींत. या काळाची ही गरज आहे कीं ज्या कोणत्या स्वरूपांत आपली संपत्ति असेल ती सगळी समाजाच्या कामीं उपयोगांत आणली गेली पाहिजे. संपत्तिदानानें प्रत्येक घर ही एक बँकच होईल. या बँकेतून लागेल त्या वेळीं समाजाला लागेल तेवढी रक्कम काढतां येईल. संपत्ति जेथें मिळाली तेथेंच तिचा विनियोग करायचा असल्यामुळें ही योजना सहज अंमलांत येऊं शकेल. लोकांचें सामुदायिक बळ यांतून निर्माण होईल. एकमेकांशीं ते बांधले जातील आणि समाजरचनेच्या कामासाठीं प्रचंड शक्ति यांतून मिळेल..."

"वाममार्गानें पैसे न मिळविण्याचें बंधनहि संपत्तिदात्यावर राहील. मी सहावा हिस्सा मागतों याचा अर्थ उरलेल्या पांचषष्ठांश संग्रहाला माझी मान्यता आहे असा नाहीं. ज्यानें समाजाला एकषष्ठांश मिळकत निरंतर अर्पण करण्याचा नियम एक जीवननिष्ठा म्हणून मान्य केला त्यानें

आपली सारी संपत्ति, सारें जीवन, एवढेंच नव्हे तर आपला जीवननिर्वाह-देखील समाजाला अर्पण करण्यासाठीं कंबर कसली. संपत्तिदान-यज्ञाकडे मी या दृष्टीनें पहातों. ''

—**विनोबा**

संपत्तिदान-यज्ञाची पद्धति अशी आहे :

( १ ) दात्यानें आपल्या प्राप्तीचा किंवा खर्चाचा एक विशिष्ट हिस्सा आयुष्यभर, किंवा सुरुवातीला निदान ५ वर्षें, दानांत द्यावयाचा. ( संपत्तिदानाचा छापील फॉर्म आहे तो भरून द्यावयाचा. )

( २ ) दानाची रक्कम दात्यापाशींच राहील.

( ३ ) विनोबा किंवा विनोबांनीं नियुक्त केलेली समिति सांगेल त्या रीतीनें त्यानें त्या रकमेचा खर्च करावयाचा.

( ४ ) खर्च केलेल्या पैशाचा त्यानेंच हिशोब ठेवून तो नियमितपणें विनोबांकडे किंवा समितीकडे पाठवावयाचा.

आज विनोबांनीं संपत्तिदानाचा विनियोग तीन गोष्टींकरितां करण्याचें योजिलें आहे :

( १ ) ज्या भूहीनांना जमीन दिली असेल त्यांना अवजारें, विहिरी, बैल व खावटी यांसारखी मदत देण्याकरितां;

( २ ) भूदान-यज्ञामार्फत होणाऱ्या नवीन समाजरचनेचें काम करणाऱ्या सेवकांच्या निर्वाहाकरितां;

( ३ ) सर्वोदय-विचाराच्या प्रचाराकरितां.

**★ गरीबांच्याकरितां जमीन मिळत आहे, ठीक आहे, त्यांना तेवढी मदत होईल; पण हिंदुस्थानची लोक-संख्या वाढत चालली आहे, त्यामुळें उत्पन्न झालेल्या प्रश्नाचें समाधान भूदान-यज्ञानें होईल काय ?**

'' या बाबतींत थोडी विचाराची स्पष्टता होण्याची जरूर आहे असें मला वाटतें. पुष्कळांचें मत आहे कीं, हिंदुस्थानची लोकसंख्या फार वाढत

आहे आणि तिचा भार होत आहे. पण हिंदुस्थानच्या लोकसंख्येहून प्रमाणानें दुप्पट लोकसंख्या झालेले इंग्लंडसारखे देश आहेत. जपानची तीच स्थिति आहे. लोक म्हणतात कीं इतकी वाढती लोकसंख्या आणि सर्व जमिनीवरच अवलंबून, हें कसें काय होणार ? मी म्हणतों, ही चिंता पुरुषार्थ-हीनतेचें लक्षण आहे. हिंदुस्थानचे सर्व उद्योगधंदे मोडून पडले आहेत, परदेशाहून सतत माल येत राहिला आहे, त्यामुळें खेड्यांतल्या लोकांना पुरतें काम मिळेनासें झालें आहे. त्यांना पुरतें काम मिळालें पाहिजे. इथलीं कामें इथेंच व्हावींत अशी व्यवस्था झाली पाहिजे. विज्ञान ज्या रीतीनें वाढत आहे त्या रीतीनें जर आम्ही काम करूं लागलों, तर लोकांच्या दोन्ही हातांना पुरतें काम मिळण्याची शक्यता आहे. तेव्हां विचार करण्या-सारख्या या गोष्टी आहेत. लोकसंख्या वाढत जावी असें माझें म्हणणें नाहीं. असंयमानें, विषयवासनेनें संख्या वाढत राहिली तरी हरकत नाहीं असें म्हणण्याचा माझा हेतु नाहीं. आम्हांला लोकसंख्या मर्यादित करावयाची आहे पण ती संयमानें, ब्रह्मचर्यानें. त्याकरितां जर आपण वाईट मार्ग काढले तर तोच धोका त्यांत आहे. पृथ्वीला लोकसंख्येचा भार होत नाहीं, पापाचा भार होतो.

"दुसरी एक गोष्ट. जेथें जीवनाची पातळी खालीं आली आहे, तेथें जंतु विषयवासनेंत रुतून राहतो. जंतुंतसुद्धां जो पराक्रमी असतो त्याला संतति कमी होते. म्हणून पराक्रमाचीं क्षेत्रें जर खुलीं झालीं, जीवनाची पातळी वर चढली, तर जरूर तितकी लोकसंख्या कमी होईल. याखेरीज परमेश्वरानें मनुष्याला काय काय देणग्या दिल्या आहेत पहा ना ! त्यानें काय दिलें नाहीं ? उत्तम वाणी, उत्तम बुद्धि, उत्तम हृदय आणि सर्वांत उत्तम वस्तु म्हणजे ज्यायोगें तो आपला चरितार्थ चालवूं शकेल असे दोन हात. ईश्वरानें आम्हांला खाण्यासाठीं दोन तोंडें आणि कामासाठीं एकच हात दिला असता, तर अडचण झाली असती. तेव्हां ईश्वरानें आपल्याकडून माणसाकरितां जें करावयाचें तें करून ठेवलें आहे, नव्हे त्यानें माणसाची आर्थिक समस्या सोपीच केली. आमची हिंदुस्थानची लोकसंख्या ३६ कोटी आहे, तर ७२ कोटी हात काम करण्यासाठीं आहेत. जे लोकसंख्येला भितात ते श्रमशक्तीलाच भितात असा त्याचा अर्थ होतो. काम केलें नाहीं

तर लोकसंख्येच्या वाढीला भ्यालें पाहिजे हें खरें. पण इतकी मोठी सेना काम करण्यासाठीं आहे ही काय शोचनीय गोष्ट आहे ? मात्र, तिचा आपण पुरता उपयोग केला पाहिजे.

" पण आज चाललें आहे काय ? पश्चिमेकडून जें अर्थशास्त्र आलें आहे त्यावरून आपण विचार करतों कीं, इतक्या हातांना जर काम द्यायचें तर मोठमोठ्या यंत्रांची गरज आहे. अशीं यंत्रें आमच्यापाशीं नाहींत. तीं नाहींत तर लहान लहान औजारांनीं लोकांना काम दिलें पाहिजे. पण लहान औजारांवर आमच्या राज्यकर्त्यांचा विश्वास नाहीं. लहान लहान औजारें वापरलीं तर आम्ही मागस होऊं अशी भीति त्यांना वाटते. आणि मोठीं यंत्रें तर नाहींतच. तेव्हां झालें आहे असें कीं, आम्हांला पाहिजे गहूं तो मिळत नाहीं. तांदूळ मिळत आहे, तर तो खाण्याची इच्छा नाहीं. म्हणजे हीं सारीं मरण्याचीं लक्षणें आहेत. पण आतां हळूहळू परिस्थितीची जाणीव होऊं लागली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. बेकारी वाढत आहे, तर त्यावर उपाय म्हणून ग्रामोद्योगांना उत्तेजन दिलें पाहिजे. हें त्यांना कळून येऊं लागलें आहे. ग्रामोद्योग सुरू होतील, तर सर्व लोकांना काम मिळेल आणि लोक कामाला लागले कीं, त्यांचें डोकेंहि काम करूं लागेल. मग त्या औजारांतहि सुधारणा होईल. त्या औजारांना जर कोणी आतांपर्यंत शिवलें सुद्धां नाहीं, तर सुधारणा कशी होणार ? हें विज्ञानाचें युग आहे, अर्थात् आपणहि त्यापासून वेगळें राहूं शकणार नाहीं. आमचा जो बुद्धिमान वर्ग आहे तो जर हें काम हातीं घेईल तर त्यांत सुधारणा होतीलच. जर विज्ञान छोट्या औजारांशीं जोडून दिलें तर त्यांत पुष्कळ सुधारणा होईल. विज्ञान म्हणजे लोक समजतात यंत्र. विज्ञानयुग म्हणजे यंत्रयुग ही कल्पना चुकीची आहे. विज्ञान ही एक आत्मज्ञानासारखी शक्ति आहे. विज्ञानाचा योग जर लहान लहान औजारांशीं केला तर मनुष्याची शक्ति वाढते आणि मोठ्या औजारांशीं केला, तर मनुष्याचा संहार होतो. तेव्हां यंत्र कोणतें ठेवायचें हें विज्ञानाचें शास्त्र नाहीं, सामाजिक शास्त्र आहे. विज्ञानानें लहान लहान औजारांची दुरुस्ती होते आणि मोठ्या औजारांची उत्पत्ति होते. अशा दृष्टीनें जर आपण विचार केला तर लोकसंख्येचा जो मोठा प्रश्न म्हणून आपल्यापुढें उभा आहे तो राहणार नाहीं.

भूदानानें हिंदुस्थानचे सारे प्रश्न सुटतील असें मी कधींच म्हटलें नाहीं. त्याच्याबरोबरच ग्रामोद्योग, विज्ञानाचा उपयोग आणि नयी तालीम हीं तीन साधनें आहेत आणि त्यांतून सर्व भागेल. अर्थात् बेजमीनवाल्यांना जमीन वांटल्याशिवाय पुढचें काम होणार नाहीं, हें निश्चित. केवळ भूमिदानानें प्रश्न सुटेल का, असें विचारलें तर मी सांगतों गरीबीचा प्रश्न सुटेल."

—विनोबा

❀

## भूदान-यज्ञांत मिळालेल्या पूर्ण गांवांची प्रांतवार संख्या

| प्रांत | गांवें |
|---|---|
| उत्कल | ४३ |
| उत्तर प्रदेश | १ |
| बिहार | १७ |
| हैद्राबाद | २ * |
| एकूण | ६३ |

* ( शुंकीशाला व रंगापूर, जिल्हा–नलगोंडा )

—

## भूदान-यज्ञ आंदोलनांत आतांपर्यंत मिळालेली व वांटलेली जमीन

(२५ नोव्हेंबर १९५४ अखेर)

| प्रदेश | प्राप्त भूमि | दानपत्रें | वांटली भूमि | कुटुंबें |
|---|---|---|---|---|
| आसाम | १,६९२ | — | — | — |
| आंध्र | १९,८१२ | ५५२ | — | — |
| उत्तर प्रदेश | ५,१६,८१९ | १४,८६८ | ६५,००५ | २१,२६२ |
| उत्कल | १,१५,२०७ | ३८,३९७ | ७०८ | २१४ |
| कर्नाटक | २,१८० | २३९ | २३९ | — |
| केरळ | २८,०३२ | १,२०० | — | — |
| तामीळनाड | २६,१०४ | ३,९७३ | ३१० | ११५ |
| गुजराथ | ३६,१७० | ७,७६० | ९९२ | २५१ |
| देहली | ९,२४५ | २४९ | ५८ | २२ |
| पंजाब | १०,१४३ | ३,००८ | — | — |
| बंगाल | ५,०७४ | २,४४२ | २५१ | १६८ |
| बिहार | २२,२७,२६८ | २,४१,७१२ | १,६१६ | ९४४ |
| मध्यप्रदेश | ८०,४८१ | १२,६१६ | ६,२९० | १४५० |
| मध्यभारत | ६२,४१२ | ५,३३७ | — | — |
| महाराष्ट्र | २०,४५४ | — | ४५ | १७ |
| म्हैसूर | ४,३९० | १,८७५ | — | — |
| राजस्थान | ३,२५,३७४ | २,१९२ | ५,८४२ | १,३६४ |
| विंध्य प्रदेश | ५,३१५ | १,०१९ | ३३१ | १५० |
| सौराष्ट्र | ४१,००० | १५,००० | — | — |
| हिमाचल प्रदेश | १,९०० | ६६ | — | — |
| हैदराबाद | १,०३,४७६ | ४,८०७ | १९,२५९ | ४,१६३ |
| एकूण | २५,४२,५४८ | ३,५७,३१२ | १,००,९४६ | ३०,१२८ |

( परिशिष्ट : १ )

# महाराष्ट्रांतील लोकसंख्या व जमीन

| जिल्हा | लोकसंख्या (हजार) | ग्रामीण लोकसंख्या (हजार) | शेतीवरील लोकसंख्या (हजार) | शेतमजूर (हजार) | कुळें (हजार) | लागवडी-खालील जमीन (हजार एकर) | पिकांखालीं जमीन (हजार एकर) | जंगल (हजार एकर) | इतर खराब (हजार एकर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणें | १५०८ | ९९३ | ८२५ | ११९ | ३६९ | ११६३ | ७३१ | ९१५ | २९९ |
| कुलाबा | ९०९ | ८१३ | ६७३ | २९ | ३८९ | ९६४ | ४५७ | ३१५ | ३०२ |
| रत्नागिरी | १७११ | १५५० | ११८९ | ४२ | ४५२ | २१५४ | ७१६ | ४७ | ८४२ |
| पश्चिम खानदेश | ११४६ | १००८ | ८८६ | २२७ | ३८ | १७९० | १६९१ | १०२७ | ५९७ |
| पूर्व खानदेश | १४७१ | ९५० | १०३६ | ३०९ | ३२ | २०५४ | १८८२ | ४१२ | ३७७ |
| नाशिक | १४३० | १०५० | ९६२ | १६७ | ४६ | २२९४ | २२२१ | ८३५ | ४१० |
| नगर | १४११ | ११०६ | १०२९ | १६६ | ३१ | ३२३० | २९७० | ४३१ | ४४६ |
| पुणें | १९५१ | १११६ | १०२१ | ८१ | ४० | २७१४ | २३३० | ४४२ | ५६५ |
| सोलापूर | १५०५ | १०२५ | ९४२ | २२१ | ७० | ३२४७ | २८१६ | ७३ | ३२३ |
| उत्तर सातारा | ११७५ | १०१४ | ८०० | ७० | ५० | १९०५ | १६४७ | ३६९ | ३०५ |
| दक्षिण सातारा | १००० | ७१९ | ७८९ | ६५ | ४९ | १८०८ | १६२४ | ११९ | ८२ |
| कोल्हापूर | १२२७ | ९५० | ९२८ | ९४ | १५४ | १०७१ | ८४२ | २८९ | ३२३ |
| डांग | ४७ | ४५ | | | | | २५ | ३८९ | |
| एकूण | १६५०३ | १२३०० | १११०० | १६०० | १७०० | २४३९६ | १९९५५ | ५७३३ | ४८७७ |

( परिशिष्ट : २ )

# महाराष्ट्रांतील लागवडीखालच्या जमिनीची विभागणी

( आंकडे हजारांचे )

| जिल्हा | ५ एकरांपर्यंत खातेदार | जमीन एकर | ५ ते १५ एकर खातेदार | जमीन एकर | १५ ते २५ एकर खातेदार | जमीन | २५ ते १०० एकर खातेदार | जमीन | १०० एकरांवर खातेदार | जमीन | सर्व खातेदार | व जमीन जमीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणें | ७५ | १३४ | १५ | १३४ | ५ | ९७ | ५ | २२४ | १ | ३७१ | १०२ | ८६२ |
| कुलाबा | ५४ | ९७ | ९ | ८७ | २ | ४९ | २ | ९६ | ·५ | १२० | ६८ | ४५१ |
| रत्नागिरी | ७२ | ९३ | १२ | १११ | ३ | ५९ | ३ | १२० | ·२ | ३७ | ९७ | ४२१ |
| पश्चिम खानदेश | २६ | ९१ | ४१ | ३७२ | २० | ३५३ | १३ | ४९९ | ·५ | १२१ | १०१ | १४३६ |
| पूर्व खानदेश | ८६ | २२३ | ६१ | ५३८ | १६ | २९२ | १० | ३९७ | ·७ | १०१ | १७४ | १५५१ |
| नाशिक | ६५ | २६४ | ६२ | ६०० | २५ | ४५० | १८ | ७७७ | ·९ | १७४ | १७२ | २२६६ |
| अहमदनगर | ६१ | १९४ | ६४ | ६५१ | ३२ | ६६८ | २६ | १०२५ | १·५ | २२१ | १८५ | २०५७ |
| पुणें | ९४ | २८१ | ५३ | ५०३ | ३१ | ५७९ | १९ | ६४६ | १·३ | १३८ | १९९ | २१४७ |
| सोलापूर | ३८ | १४० | ४४ | ४२५ | २३ | ४६३ | २५ | ९९२ | २·२ | ३३८ | १३३ | २३६२ |
| सातारा | १६३ | ४३४ | ६६ | ५५४ | १७ | २९३ | १[illegible] | ३९७ | ·५ | ६३ | २५७ | १७११ |
| कोल्हापूर | १३८ | ३०४ | ३९ | ३१८ | १० | १६२ | ६ | १९७ | ·४ | १२४ | १९४ | ११०४ |
| एकूण (महाराष्ट्र) | ८७६ | २२६१ | ४६६ | ४१६१ | १८६ | ३६६२ | १४१ | ५३७८ | १० | १७०८ | १६७९ | १६४७३ |
| मुंबई प्रांत | १३१३ | ३६७२ | ७०७ | ६५४८ | २९४ | ५१६३ | २०१ | ८११४ | १५ | २७४२ | २५१० | २६२३९ |

[ हे आंकडे रयतवारी गांवांतील आहेत. तसेंच ते संस्थानांच्या विलिनीकरणापूर्वींचे आहेत. तथापि, त्यांत कोल्हापूर जिल्ह्यांतील आंकडे समाविष्ट केले आहेत. इतर विलीन संस्थानांचे व बिगर रयतवारी गांवांतील आंकडे त्यांत नाहींत. ]

[ आवृत्ति ४ थी. नोव्हेंबर १९५४ ]

किंमत ४ आणे

★

**महाराष्ट्र भूदान प्रकाशनें:—**

| | | |
|---|---|---|
| ❀ आंदोलन | किंमत | ३ आणे |
| ❀ भूमिका | ,, | १ आणा |
| ❀ भूदान-पद्यमाला | ,, | २ आणे |
| ❀ जीवनदान | ,, | २ आणे |
| ❀ गांवाचें गोकूळ | ,, | ४ आणे |

आणि भूदानासंबंधींचें हिंदी वाङ्मय

★

प्रकाशक : सदाशिव जगन्नाथ ऊर्फ भाऊ धर्माधिकारी,
सहमंत्री, महाराष्ट्र सेवा संघ, ३६१ सदाशिव पेठ, पुणें २.
मुद्रक : रा. ना. सरनाईक, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार, पुणें २.